RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com  Vidabh Kesari News  90969 45629  @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
११ शनिवार एप्रिल २०२६
✲ वर्ष ५ ✲ अंक ३१५
✲ पृष्ठ : ६ ✲ मूल्य रु : ३

## वाघाच्या हल्ल्यात ६ वर्षीय चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू

**▸विदर्भ केसरी। अर्जुनी मोरगाव ,**

तालुक्यातील आदर्श धाबेटेकडी येथे आज शुक्रवारी सायंकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास अत्यंत हृदयद्रावक घटना घडली. प्रज्वल गोवर्धन मेश्राम (वय ६ वर्षे) हा निरागस चिमुकला घराजवळ खेळत असताना अचानक दबा धरून बसलेल्या वाघाने त्याच्यावर हल्ला केला. वाघाने क्षणार्धात प्रज्वलला उचलून जंगलाच्या दिशेने ओढत नेले. ही घटना पाहताच कुटुंबीय व गावकऱ्यांनी आरडाओरड केल्याने वाघाने जंगलाच्या दिशेने पळ काढला. त्यानंतर ग्रामस्थांनी एकत्र येत तात्काळ शोधमोहीम सुरू केली. काही वेळानंतर घरापासून काही अंतरावर प्रज्वल गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. मात्र, या भीषण हल्ल्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण गाव शोकाकुल झाले असून, परिसरात भीतीचे सावट पसरले आहे.

## बालविवाह रोखला

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

घाटंजी तालुक्यातील कुऱ्हाड येथे होणारा एका अल्पवयीन बालिकेचा बालविवाह जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या सतर्कतेमुळे यशस्वीपणे रोखण्यात आला. या तत्पर कारवाईमुळे एका बालिकेचे भविष्य सुरक्षित झाले असून परिसरातून प्रशासनाच्या कामगिरीचे कौतुक होत आहे. कुऱ्हाड येथे अल्पवयीन मुलीचा विवाह लावला जाणार असल्याची गोपनीय माहिती जिल्हा बाल संरक्षण कक्षाला प्राप्त झाली होती. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पथक तातडीने गावात दाखल झाले. यावेळी मुलीच्या कुटुंबीयांसह उपस्थित नातेवाईकांना बालविवाह प्रतिबंधक कायद्याची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच बालविवाह केल्यास होणाऱ्या कठोर शिक्षा व दंडाच्या तरतुदी समजावून सांगण्यात आल्या.

# नागपुरात युवक काँग्रेसचा एल्गार

## आसामचे मुख्यमंत्री हिमांता बिस्वा सरमा यांच्या वक्तव्याचा नोंदविला निषेध

**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

आसामचे मुख्यमंत्री हिमांता बिस्वा सरमा यांनी काँग्रेस अध्यक्ष आणि देशातील ज्येष्ठ बहुजन नेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्याबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचे पडसाद आता संपूर्ण राज्यात उमटत आहेत. या विधानाचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस आणि नागपूर शहर युवक काँग्रेसच्या वतीने शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी देवडिया काँग्रेस भवन येथे उग' आंदोलन करण्यात आले.

दलितांचा अपमान करणा-यांचा निषेध असो, भाजपचा मनुवाद हद्दपार करा आणि संविधानावर हल्ला सहन करणार नाही अशा आ क्रमक घोषणा देत युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी परिसर डोक्यावर घेतला होता. संतप्त कार्यकर्त्यांनी सरमा यांच्या प्रतिमेला जोडे मारले आणि त्यांच्या पुतळ्याचे दहन करण्याचा प्रयत्न करून आपला तीव्र रोष व्यक्त केला. युवक काँग्रेसने यावेळी काँग्रेस प्रवक्ते पव न खेरा यांच्यावर झालेल्या कारवाईचाही तीव्र निषेध केला. विरोधकांचा आवाज दडपण्यासाठी सत्तेचा गैरवापर




केला जात आहे, हा लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रकार आहे, असा गंभीर आरोप यावेळी क रण्यात आला.आंदोलनादरम्यान परिस्थि ती तणावपूर्ण झाल्याने पोलिसांनी हस्तक्षेप करत अने क पदाधिकारी व कार्यकर्त्यां ना ताब्यात घेतले. मात्र, पोलिसांच्या या कारवाईमुळे कार्यकर्त्यांचा उत्साह कमी न होता रोष अधिकच वाढलेला पाहायला मि ळाला. युवक काँग्रेसने स्पष्ट इशारा दिला आहे की, हा केवळ राजकीय विरोध नसून बहुजन समाजाच्या अस्मितेचा लढा आहे.



## बच्चू कडू ध्वनीफित प्रकरणात कारवाई करा

**▸विदर्भ केसरी। चांदूर बाजार,**

माजी आमदार बच्चू कडू व गोलू माहोरे यांची सोशल मीडियावर व्हायरल होत असलेली कथित ऑडिओ क्लिपची सत्यता पडताळून संबंधितांवर कायदेशीर दंडात्मक कारवाई करा, अशी मागणी तालुका भाजपाचे अध्यक्ष रमेश तायवाडे यांनी पोलिस निरीक्षक अशोक जाधव यांना दिले.

आ. प्रवीण तायडे याचे चुलत भाऊ अभिजित तायडे यांच्या अपघाताचा बनाव करून त्यांना जीवे मारण्याची ध्वनीफित सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने, राज्याच्या राजकारणात खळबळ माजली असून दोन्ही पक्षाकडून आरोप प्रत्यारोप होत आहे. या घटनेमुळे राजकीय पक्षांमध्ये कार्य करणाऱ्या सर्वसामान्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा प्रकारच्या गंभीर स्वरूपाच्या चर्चेमुळे सामान्य नागरिकांमध्येही दहशतीची भावना पसरत आहे.

ही सर्व परिस्थिती पाहता ऑडिओ क्लिपची सत्यता पडताळून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करा. योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, या मागणीचे निवेदन देण्यात आले. निवेदन देतेवेळी सरपंच अजिंक्य चूनडे, सचिन तायवाडे, विकी राठी, अनिल वाट, अंकुश यावतकर, रुक्मिणी सहारे व असंख्य भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे

!! पाहिजेत !!

**कार्यालय व्यवस्थापक** (Office Manager)
'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.

⏭ पात्रता आणि आवश्यकता:

पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.
**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.

- शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर
- आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.
- एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.

इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:
कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.
संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९



## झोपडपट्टीला भीषण आग

**▸विदर्भ केसरी।**

भाईंदर पूर्वमधील इंद्रलोक पोलीस चौकी समोरील अनधिकृत झोपडपट्टीला शुक्रवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या ठिकाणी सिलेंडरचे एकापाठोपाठ एक स्फोट मोठे झाले. त्यामुळे आग प्रचंड भडकली होती.

रात्री आठ वाजता अचानक झोपडपट्टीमध्ये स्फोटांचे आवाज ऐकायला मिळाले. त्यानंतर आगीचे भयावह लोळ आणि धुरांचे लोट सगळीकडे पसरले. या भीषण आगीमुळे परिसरामध्ये एकच घबराट माजली. महापालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी दाखल होऊन आग आटोक्यात आणली. सुमारे 25 गॅस सिलेंडर काढण्यात आले त्यातील सुमारे 18 सिलेंडर आगीत स्फोट फुटलेले आढळून आले.अग्निशमन दलाने रात्री उशिरापर्यंत तीन मृतदेह बाहेर काढले आहेत. तिन्ही मृतदेह पूर्णपणे जळून गेले असून त्यांची ओळख पटवण्याचे काम रात्री सुरू होते.

# यवतमाळ शहरात युवकाची हत्या

## छिन्नविछिन्न अवस्थेत आढळला मृतदेह : शरीरावर चाकूचे वार

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

यवतमाळ शहरात कामानिमित्त आलेल्या एका युवकाचा मृतदेह शहरातील नागपूर बायपास परिसरातील आणि वेनिशिया पार्कच्या मागील भागात शुक्रवारी (ता.१०) सकाळच्या सुमारास आढळला. त्यामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. तरुणाच्या शरीरावर चाकूने सपासप वार करण्यात आले असून, हा निर्घृण खून असल्याचा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. संतोष टेकाम असे मृतकाचे नाव आहे. तो तालुक्यातील लाडखेड पोलिस स्टेशन अंतर्गत गावातील रहिवासी आहे. यवतमाळ शहरात कामानिमित्त आला असून तो यवतमाळ शहरातील पूनम चौकात राहत होता. दरम्यान शुक्रवारी त्याचा मृतदेहच आढळला. या घटनेची पोलिस तक्रार दाखल करण्यात आली असून शहर पोलिस स्टेशनचे ठाणेदार रामकृष्ण जाधव तपास करीत आहे.



- **घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक पाहणीत मृत तरुणाच्या शरीरावर चाकूने वार केल्याचे गंभीर घाव दिसून आले आहेत. हल्लेखोरांनी अत्यंत क्रूरपणे हा वार केला असून, त्यानंतर तरुणाचा मृत्यू झाल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून रक्ताचे नमुने आणि इतर तांत्रिक पुरावे गोळा केले आहेत. पोलिसांच्या पथकाकडून आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पाहणी केली जात आहे. शहर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात रवाना केला आहे.**
- **या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, मारेकऱ्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची वेगवेगळी पथके रवाना झाली आहेत.**

## निलंबित नगरसेवकांची 'प्रतीकात्मक सभा



**▸विदर्भ केसरी। अकोला :**

अकोला महापालिकेत विरोधी गटातील १६ नगरसेवकांना निलंबित केल्याचा मुद्दा शुक्रवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत पुन्हा एकदा गाजला. या मुद्द्यावरून सभेत गदारोळ झाला. सत्ताधाऱ्यांचा निषेध म्हणून विरोधी पक्षनेत्याच्या कक्षासमोर निलंबित नगरसेवकांनी प्रतीकात्मक सभा घेतली. सत्ताधाऱ्यांवर भ्रष्टाचारासह मनमानी कारभाराचा आरोप करण्यात आला. या प्रतीकात्मक सभेची चांगलीच चर्चा रंगली.

महापालिकेच्या अर्थसंकल्पीय सभेत गोंधळ घातल्या प्रकरणी महापौरांनी १६ सदस्यांना तीन सभांसाठी निलंबित करण्याचे आदेश दिले. त्यानंतर आज महापालिकेची सर्वसाधारण सभा घेण्यात आली. या सभेच्या सुरुवातीलाच विरोधी पक्षातील नगरसेवकांनी निलंबन मागे घेण्याची मागणी केली. मात्र, सत्ताधाऱ्यांनी ती मागणी फेटाळून लावत सभेचे कामकाज सुरू केले. या मुद्द्यावरून सभेत चांगलाच गदारोळ झाला. सभेच्या सुरुवातीला गेल्या तीन सभांचे इतिवृत्त विषय क्रमांक २० ला मंजुरी देण्यात आली. विविध निधी योजनेंतर्गत चर्चा करून निर्णय घेण्यात आला. निधीतून कामे करण्यासंदर्भात नगरसेवकांनी विविध कामे सूचवली. नागरी लोककल्याण अभियान राबविण्यावर कामे प्रस्तावित केले. इतरही काही विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आला.

विरोधकांच्या प्रतीकात्मक सभेत सत्ताधारी गटाची चांगलीच खिल्ली उडविण्यात आली. सभागृहाचे कामकाज मनमानी पद्धतीने चालवले जाते, हे दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच महापौर यांच्यापेक्षा इतर नेते सभागृहाचे कामकाज कसे चालवतात, याचे उदाहरण देण्यासाठी महापौरांनी निर्णय घेण्यापूर्वी त्यांना चिठ्ठी देण्यात आली. तसेच विरोध केल्या नंतर संबंधित नगरसेवकाला पडीत वॉर्ड देण्याचे आश्वासन या सभेत देण्यात आले. महापालिकेत सर्वसाधारण सभा आणि निलंबित नगरसेवकांची प्रतीकात्मक सभेने चांगलेच गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.



दैनिक विदर्भाचा मानबिंदू
# विदर्भ केसरी
शनिवार, ११ एप्रिल २०२६ 

## अग्रलेख

# काळे ढग, रुपेरी रेषा

सुमारे चार वर्षांपूर्वी, 2022 मध्ये जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्था असलेल्या राष्ट्रांच्या जी-20 परिषदेपाठोपाठ कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राशी संबंधित असलेल्या 'ग्लोबल पार्टनरशिप ऑफ आर्टिफिशियल इन्टेलिजन्स' (जीपीएआय) या आंतरराष्ट्रीय जागतिक भागीदारी संघटनेचे अध्यक्षपदही भारताकडे आले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून जबाबदार आणि मानवकेंद्रित विकास साधण्याबाबतच्या भारताच्या भरीव कामगिरीला आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेली ही मान्यता मानली जाते. तरीही, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या आक्रमणाची चिंता दूर झालेली नाही. 2023 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेतही कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या आक्रमणाबाबत चिंता व्यक्त करणारा सूर उमटला होता. कृत्रिम बुद्धिमत्ता हे संकट आणि की वरदान यावर त्या परिषदेत स्पष्ट एकमत झालेले नाही, परंतु याचा वापर विवेकाने झाला नाही, तर हे संकटच ठरणार यावर मात्र अनेक राष्ट्रांचे एकमत झाले होते. यंत्र आणि तंत्र ही मानवाच्या भौतिक विकासाची साधने हाती लागल्यामुळे बहुतांश समाज तंत्रजीवी होत असून, आता तर मानवी मेंदूकरवी करून घेतली जाणारी अनेक कामे करण्यासाठी ही कृत्रिम बुद्धिमत्ता आता सिद्ध झाली आहे. जिथे मानवी मेंदूची क्षमता संपते, तेथे कृत्रिम बुद्धिमत्तेची क्षमता सुरू होते, असे या तंत्राबाबत अभिमानाने सांगितले जाते. जगातील अनेक देशांनी विकासाच्या नव्या वाटचालीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर प्राधान्याने सुरूदेखील केला असून, नजीकच्या भविष्यात माणसाच्या सहभागाची गरज असलेल्या क्षेत्रांतही कृत्रिम बुद्धिमत्तेला कामाला लावता येईल, असे लक्षणीय संशोधन पूर्ण झाले आहे. जसजशी प्रगतीच्या पुढच्या टप्प्याची प्रतीक्षा सुरू होते, तसतसे तंत्रावलंबित्व वाढत चालल्यामुळे एक दिवस यंत्रांच्या स्वाधीन होऊन, अवयवांकरवी करून घ्यावयाची सारी कामे यंत्रांकरवी करून घेण्याची वेळ येईल आणि माणसाचेच यंत्र होऊन जाईल हा विचार शक्यतेच्या सीमा ओलांडून वास्तवाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने माणसाच्या मेंदूचे काम बरेचसे हलके केल्यानंतर प्रगतीचा टप्पा माणसाला कोणत्या नव्या विचाराच्या किंवा चिंतेच्या खाईत नेऊन सोडणार आहे, याचा विचार करण्याची ही वेळ आली आहे. कारण, माणसाची कामे सोपी करण्यासाठी यंत्रांच्या विश्वात प्रगती करता करता माणसाचेच यंत्र व्हावे ही कल्पना कालपरवापर्यंत मोठी मनोरंजक वाटत होती. पण ही कल्पना आता केवळ स्वप्नरंजन राहिलेली नाही. मानवी मेंदूमध्ये बसविली जाणारी एक लहानशी चिप मेंदूच्या कामाचा ताण हलका करण्यास समर्थ ठरणार आहे. तशी चिप बसविण्याचा, म्हणजे मानवी मेंदूमध्ये चिपचे प्रत्यारोपण करण्याचा प्रयोग अमेरिकेत यशस्वी झाल्याची घोषणा अमेरिकेतील एक उद्योगपती एलन मस्क यांनी काही वर्षांपूर्वी केली आणि त्याचे पडसाद जगभर उमटले. मस्क यांच्या कंपनीनेच अशी चिप तयार केली आणि ज्या माणसाच्या मेंदूत ही चिप यशस्वीपणे बसविली आहे, त्याची प्रकृती उत्तम असून काही कामे करण्याकरिता ही चिप मेंदूला सहकार्य करू शकणार आहे. मानवी मेंदूमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचेच एक प्रकारे रोपण करणारी ही चिप बसविण्याकरिता अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाने परवानगी दिल्यानंतर लगेचच, म्हणजे केवळ सहा-सात महिन्यांतच अमेरिकेत चिपयुक्त मेंदूचा माणूस तयारही झाला आणि माणसाचे यंत्र होण्याचा एक महत्त्वाचा टप्पा पूर्णदेखील झाला. भविष्यात जेव्हा कधी चिप बसविलेल्या मेंदूच्या माणसांची गर्दी होऊ शकेल, तेव्हाची दुनिया कशी असेल याची कल्पना करणे आजच्या घडीला विचारशक्तीच्या पलीकडचे ठरणार आहे. नव्या जगातील माणूस नावाचे हे यंत्र प्रगतीच्या पुढच्या टप्प्यावर पोहोचत असतानाच, नैसर्गिक मेंदूच्या कमाल क्षमता सिद्ध करणाèया बुद्धिमान तरुण पिढीचे काय होणार हा प्रश्न आता भयाणपणे समोर उभा राहिला आहे. भविष्याच्या सुरक्षिततेबाबत आश्वस्त असलेल्या तरुणाईला याच तंत्रावलंबित्वाचा फटका बसू लागला आहे. ओरॅकल नावाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तंत्रज्ञान क्षेत्रातील एका कंपनीतील तब्बल 12 हजार कुशल भारतीय कर्मचाèयांना एका नव्या पहाटे केवळ एका ई-मेलद्वारे हाती नारळ देऊन नोकरीवरून काढून टाकल्याचा संदेश येतो, तेव्हा नव्या तंत्रावलंबित्वाचे परिणाम सुस्पष्टपणे जाणवू लागतात. म्हणूनच, विकासाची रुपेरी रेषा या भावनेने ज्या तंत्रज्ञानाकडे पाहिले जात होते, त्या रेषेमागे चिंतेचे काळे ढगदेखील आहेत, ही जाणीव आता गडद होऊ लागली आहे. ओरॅकल नावाच्या कंपनीतील 12 हजार भारतीय कर्मचाèयांवर आदळलेली बेरोजगारीची कुऱ्हाड ही तर केवळ एक सुरुवात आहे. जसजशी कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील गुंतवणूक वाढत जाईल, तसतशी नैसर्गिक बुद्धिमत्तेची गरज कमी होत जाईल याचे संकेत देणारी ही घटना म्हणजे रुपेरी रेषेमागच्या काळ्या ढगांचे अस्तित्व गडद करणारी ठरणार आहे. ओरॅकल या कंपनीचे भारतात सुमारे 30 हजार कर्मचारी असल्याचे सांगण्यात येते. आपल्या क्षमता सिद्ध करून आपला भविष्यकाळ सुरक्षित करण्याइतपत आश्वस्तता या कर्मचाèयांनी प्राप्त केली होती. मात्र, अचानक एका सकाळी हाती निरोपाचा नारळ मिळाल्यानंतर भविष्याच्या अनिश्चिततेचे सावट दाटते आणि अवघ्या तंत्रज्ञान क्षेत्रातील कर्मचाèयांमध्ये असुरक्षिततेच्या जाणिवेची अवकळा दाटते हे चित्र चिंताजनक आहे. मुळात सध्या युद्धस्थितीमुळे सर्वत्र अनिश्चिततेची दाट छाया पसरलेली असताना त्याच्या भयात भर घालणाऱ्या अशा घडामोडींतही दिलाशाची दुसरी बाजू अंधुकपणे उजोडात येताना दिसते, तेव्हा नैराश्याचे गडदपणही काहीसे धूसर होऊ लागते. युद्धाच्या संकटामुळे जगभरातील अनेक अर्थव्यवस्थांना मोठा फटका बसू लागला असून त्याच्या झळा घराघरापर्यंत पोहोचू लागल्या आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेपासून, खते, औषधे आणि चप्पल-बुटांसारख्या वस्तूदेखील महागाईच्या गर्तेत गटांगळ्या खाऊ लागल्याने, आर्थिक व्यवस्थापनाची चिंता दिवसागणिक गडद होणार आहे. अशा संकटाच्या परिस्थितीत बेरोजगारीची कुèहाड कोसळण्यासारखी अन्य चिंताजनक बाब नाही. तरीही, दुसरीकडे मात्र रोजगाराच्या संधींबाबतचे सामान्य चित्र मात्र काहीसे दिलासादायक असल्याची सुखद वार्ता नुकतीच समोर आल्याने, चिंतेच्या काळ्या ढगांची रुपेरी किनार जाणवून देणारी आनंददायी बाब म्हणून त्याकडे पाहावे लागेल.



रुटमार्च....

यवतमाळ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगामी जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी यवतमाळ शहर पोलिसांनी शुक्रवारी (दि. १०) सायंकाळी शहराच्या मुख्य मार्गावरून दिमाखदार 'रूट मार्च' काढला. हा रुटमार्च उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सायंकाळी ६.३० वा पासून यवतमाळ शहरातील प्रमुख मार्गाने तसेच संवेदनशील मार्गाने टांगा चौक, सरदार चौक, गांधी चौक, गणेश चौक, शिवाजी चौक, महात्मा फुले चौक, अशोक नगर, आंबेडकर नगर, जय भीम चौक, अण्णाभाऊ साठे चौक, आंबेडकर चौक, कळंब चौक, गुजरी चौक, सुवालाल चौक, पाच कंदील चौक या मार्गाने रूट मार्च करून पो. स्टे ला सायंकाळी ७.३० वा परत आले.. सदर रूट मार्च करिता पो. नी यवतमाळ शहर. पो. स्टे अवधूतवाडी. पो.स्टे यवतमाळ ग्रामीण. पो. स्टे. लोहार पो स्टे. लोहारा, API/PSI -13 पोलीस अंमलदार 57 असे रूट मार्च करिता हजर होते. (विदर्भ केसरी, छायाचित्रसेव)

## डेहनीच्या फार्म हाऊसला भीषण आग

**▸विदर्भ केसरी। तिवसा,**

तालुक्यातील मौजे डेहनी रोडवरील शेतकरी रंगराव लव्हाळे यांच्या फार्म हाऊसला आज सायंकाळी सुमारे ६ वाजता अचानक भीषण आग लागून मोठे नुकसान झाले.

या आगीत मोसंबीची झाडे, स्प्रिंकलर पाईप, ताडपत्री, बांबू (बासे) तसेच शेतीसाठी साठवून ठेवलेले शेणखत पूर्णतः जळून खाक झाले असून शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती



आहे. माहितीनुसार, तिवसा - निंभोरा रोडलगतच्या डेहनी परिसरातील लव्हाळे यांचे अद्यावत फार्म हाऊस आहे. सायंकाळच्या सुमारास अचानक आग लागल्याने काही वेळातच आगीने भीषण रूप धारण केले. परिसरात मोठ्या प्रमाणात धुराचे लोट पसरल्याने नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली.

## वणीत गोवंश तस्करीचा पर्दाफाश, तीन आरोपींवर गुन्हे दाखल

**▸विदर्भ केसरी। वणी :**

वणी शहरातील गोकुळनगर परिसरात शुक्रवारी (दि. १० एप्रिल) सकाळी पोलिसांनी गोमांस तस्करी व विक्रीविरोधात सलग दोन कारवाया करत मोठा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत तीन आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण हजारो रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आला आहे.

सकाळी साडेसातच्या सुमारास गोकुळनगर येथे पोलिसांनी छापा टाकून आरोपी सलमान शकिल शेख (२५) व नावेद शेख रियाज (२२), दोघेही रा. खडबडा मोहल्ला, यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून सुमारे ९० किलो ५०० ग्रॅम गोमांस (किंमत अंदा ₹ १८,१००) जप्त करण्यात आले. हे मांस अवैधरित्या विक्रीसाठी साठवून ठेवले असल्याचे फिर्यादी विशाल दुधबळे यांच्या जबानीवरून स्पष्ट झाले. या प्रकरणी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील कलम 5, 5(सी), 9, 9 (अ) तसेच BNS कलम 3(5) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपास पोलीस हवालदार मारोती पाटील करत आहेत. दुसरी कारवाई : गोमांसासह मोपेड जप्त यानंतर सकाळी ९ वाजताच्या सुमारास त्याच परिसरात दुसरी कारवाई करण्यात आली. आरोपी अब्दूल माजिद अब्दूल सत्तार (३५), रा. मोमिनपुरा याला अटक करण्यात आली. गोमांसासह मोपेड जप्त आरोपी अब्दूल माजिद अब्दूल सत्तार (३५), रा. मोमिनपुरा याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून ३९ किलो गोमांस ( ₹७,८००) तसेच विना नंबरची ज्यूपीटर मोपेड (₹ २०,०००) असा एकूण ₹ २७,८०० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर आरोपी हा मोपेडवरून गोमांस विक्रीसाठी नेत असल्याची माहिती उघड झाली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस कर्मचारी गजानन सावसाकडे करीत आहेत.


## शेतकरी नेते भूषण कुंटे यांच्या धडक पाठपुराव्याला यश

### शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा!

**▸विदर्भ केसरी। सतीश भालेराव**

**नागपूर:** विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देणारे महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय प्रवक्ते, विदर्भ कार्याध्यक्ष तथा नागपूर जिल्हा अध्यक्ष भूषण कुंटे यांच्या प्रयत्नांना मोठे यश आले आहे. गोंदिया जिल्ह्यात ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या हजारो धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात नुकसानभरपाईची रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे. ३१ मार्चच्या अंतिम मुदतीपूर्वी ही मदत मिळाल्याने बळीराजाला मोठा आधार मिळाला आहे.

ऑक्टोबर २०२५ मध्ये गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा, आमगाव, देवरी आणि अर्जुनी मोरगाव तालुक्यात निसर्गाचा कोप झाला होता. हाता तोंडाशी आलेला घास अवकाळी पावसाने हिरावून नेला. कापणी केलेले



धान पाण्यात भिजून सडले, तर उभ्या पिकाचेही मोठे नुकसान झाले. या संकटकाळात भूषण कुंटे यांनी तातडीने प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली आणि शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

#### ■ प्रशासकीय पातळीवर आक्रमक भूमिका

भूषण कुंटे यांनी केवळ सांत्वन न करता प्रशासकीय स्तरावर आक्रमक पवित्रा घेतला. त्यांनी जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि राज्य शासनाच्या कृषी विभागाकडे पाठपुरावा केला. सालेकसा तालुक्यातील दरेकसा, मुरकुटडोह, आणि दंडारी यांसारख्या दुर्गम भागातील शेतकऱ्यांचे पंचनामे तातडीने व्हावेत आणि त्यांना नवीन हंगामासाठी ३१ मार्चपूर्वी आर्थिक मदत मिळावी, ही मागणी त्यांनी लावून धरली होती.

#### ■ यशाचे महत्त्वाचे टप्पे:

१. तातडीचे पंचनामे: कुंटे यांच्या पत्राची दखल घेत जिल्हा प्रशासनाने सर्व तहसीलदारांना तातडीने शेतावर जाऊन पंचनामे करण्याचे आदेश दिले. २. निधी मंजूर: महसूल विभागाकडून नुकसानीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनाकडून विशेष निधी खेचून आणण्यात यश आले. ३. थेट मदत (D B T ): कोणताही मध्यस्थ न ठेवता मदत निधी थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला. 4. शेतकऱ्यांकडून समाधान भूषण कुंटे यांच्या नेतृत्वाखालील या यशस्वी लढ्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. "जर संघटनेने पाठपुरावा केला नसता, तर ही मदत मिळण्यास विलंब झाला असता," अशी भावना स्थानिक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. रब्बी हंगामातील खते, बियाणे आणि मजुरीचा खर्च भागवण्यासाठी ही रक्कम आता अत्यंत मोलाची ठरणार आहे.

#### ■ पुढील दिशा

या यशानंतर बोलताना भूषण कुंटे यांनी सांगितले की, "शेतकऱ्यांच्या हक्काचा पैसा त्यांच्या खात्यात जमा झाला, याचे समाधान आहे. मात्र, अद्यापही काही तांत्रिक कारणांमुळे ज्या शेतकऱ्यांची मदत रखडली आहे, त्यांच्यासाठी आमचा लढा सुरूच राहील. प्रत्येक बाधित शेतकऱ्याला त्याचा मोबदला मिळेपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही." या विजयामुळे भूषण कुंटे यांचे नेतृत्व आणि महाराष्ट्र शेतकरी संघटनेची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## कचरा डेपोला भीषण आग



**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

शहरालगत असलेल्या सावरगड येथील कचरा डेपोला शुक्रवारी (दि. १०) सकाळी भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. सकाळी १०.३० च्या सुमारास लागलेली ही आग वाऱ्यामुळे इतकी रौद्र झाली की, ती विझवण्यासाठी यवतमाळ सह आजूबाजूच्या तीन तालुक्यांतील अग्निशमन दलाला पाचारण करावे लागले. तब्बल सात तासांच्या अथक परिश्रमानंतर आग आटोक्यात आली तरी सर्वत्र धुराचेचे लोळ उठतच होते.

प्राथमिक अंदाजानुसार, कचरा डेपोच्या बाजूला असलेल्या शेतातील कचरा किंवा धुरा जाळण्यात आला होता. या धुऱ्यावरील आग वाऱ्याच्या वेगाने कचरा डेपोपर्यंत पोहोचली आणि काही क्षणातच संपूर्ण परिसरात आगीचे लोळ उठले. वाळलेला कचरा आणि प्लास्टिकमुळे आगीने भीषण रूप धारण केले होते. आगीची माहिती मिळताच यवतमाळ नगर परिषदेच्या अग्निशमनच्या ३ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. मात्र, आगीची दाहकता पाहता राळेगाव, घाटंजी आणि कळंब येथूनही प्रत्येकी १-१ गाडी मागविण्यात आली. अशा एकूण ६ अग्निशमन गाड्या, जीटिंग मशीन आणि जेसीबीच्या साहाय्याने कचरा उपसून आग विझवण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात आले. कचरा डेपोला लागलेल्या या आगीमुळे निर्माण झालेला विषारी धूर सावरगड आणि परिसरातील गावांमध्ये पसरला होता. अग्निशमन अधिकारी विनोद खरात यांच्या नेतृत्वात ही मोहीम राबवण्यात आली. चालक विपीन रहांदले, फायरमन हेमंत डोंगरे, रवी चौधरी, निखिल पाठक, राहुल यादव, मनीष पवार, रमेश चौधरी, राजू इंगळे, सागर वाढई, योगेश यादव आणि नितीन जगताप यांनी जिवाची पर्वा न करता धुराच्या लोटात शिरून आग विझवली. याव्यतिरिक्त कळंब, राळेगाव आणि घाटंजी येथील तीन स्वतंत्र टीम्सनीही या मोहिमेत मोलाचे सहकार्य केले.




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

महत्त्वाचे

## महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त कळंब येथे जाहीर व्याख्यानाचे आयोजन

**▸विदर्भ केसरी। कळंब तालुका प्रतिनिधी : विरेंद्र चव्हाण**



कळंब : महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त कळंब येथे विशेष जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी (शनिवार) सायंकाळी गांधी चौक, कळंब येथे हा कार्यक्रम पार पडणार आहे. या प्रसंगी सुप्रसिद्ध व्याख्याते, लेखक तथा सामाजिक विचारवंत मा. चंद्रकांत झटाले यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान होणार आहे. समाजप्रबोधन आणि विचारजागृती या उद्देशाने महात्मा फुले जन्मोत्सव समिती कळंब तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानाचा लाभ घेण्यासाठी सर्व नागरिक, महिला, युवक-युवती, विद्यार्थी तसेच फुले-शाहू-आंबेडकर विचारांचे अनुयायी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक समितीने केले आहे

## शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी अवैध वसुली; रुग्ण हक्क संरक्षण समितीची तक्रार

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ | प्रतिनिधी**



यवतमाळ येथील श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पोस्टमार्टम (शवविच्छेदन) प्रक्रियेदरम्यान मृतकांच्या नातेवाईकांकडून अवैधरित्या पैशांची मागणी व वसुली केली जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या प्रकारामुळे आधीच दुःखात असलेल्या कुटुंबीयांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असून, आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. नागरिकांतून या प्रकाराबद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात असून, "रुग्णालय हळूहळू श्मशानालयात रूपांतरित होत आहे," अशा शब्दांत प्रतिक्रिया उमटत आहेत. या प्रकरणी रुग्ण हक्क संरक्षण समितीने रुग्णालयाचे मुख्य अधिष्ठाता यांच्याकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी कर्मचाऱ्यांवर तात्काळ व कडक कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांचे हक्क सुरक्षित राहावेत आणि कोणत्याही प्रकारचे आर्थिक शोषण होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष देणे आवश्यक असल्याचे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. या वेळी महिला विदर्भ अध्यक्षा मनीषा तिरणकर, मोबीन शेख, अविनाश धनेवार, सुरजित सिंह राठोड, सलीम शेख, आकाश चमेडिया, जिजा तलवारे, उषा श्रीराम यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# मंत्रिपदाविना विकास 'कोमात'

## सुधीरभाऊंच्या नेतृत्वाची जनतेला लागली ओढ!

**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड -:**

ए केकाळी सत्तेच्या केंद्रस्थानी अस लेला आणि विकासकामांचा धडाका लावणारा चंद्रपूर जिल्हा सध्या राजकी य उपेक्षेचा धनी ठरत आहे. रा ज्याच्या मंत्रिमंडळात जिल्ह्याला स्थान न मिळाल्याने विकासाची चाके रुतली असून, सर्वसामान्य जनतेमध्ये आता तीव्र संताप व्यक्त होत आहे. "आमचा हक्काचा मंत्री कुठे?" असा सवाल आता चंद्रपूरच्या गल्लीबोळांतून विचारला जात आहे.

मागील कार्यकाळात सुधीर मु नगंटीवार यांच्याकडे मंत्रिपद आणि जिल्ह्याचे पालकमंत्रीपद असताना चं द्रपूरने विकासाची नवी उंची गाठली होती. विशेषतः बल्लारपूर विधानसभा मत दारसंघात झालेला कायापालट हा राज्यासाठी अभ्यासाचा विषय ठरला.



जा ग तिक दर्जाचे बांबू संशोधन केंद्र, सैनिकी शाळा, भव्य क्रीडा संकुल आणि रस्ते विकासाचे जाळे ही मुनगंटीवारांच्या दूर दृष्टीची फळे आजही जनतेसमोर आहेत. केवळ घोषणा न करता निधी खेचून आणण्याची धमक सुधीरभाऊंनी दाखवली होती, ज्याची उणीव आज जिल्ह्याला पदोपदी भासत आहे.

**■ सरकारला 'घरचा आहेर' अन् वाढलेली लोकप्रियता**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा अधिवेशनात सुधीर मु नगंटीवार यांनी ज्या पद्धतीने स र्वसामान्यांचे प्रश्न मांडले, ते पाहून स त्ताधारीच नव्हे तर विरोधकही अवाक झाले. आपल्याच सरकारला धारेवर धरत जनहितासाठी दिलेला 'घरचा आहेर' त्यांची जनतेप्रती असलेली निष्ठा सिद्ध करून गेला. यामुळे केवळ भाजपच्या कार्यकर्त्यांमध्येच नव्हे, तर विरोधी पक्षांतील नेत्यांमध्येही त्यांच्याबद्दल आदराची आणि आपुलकीची भावना निर्माण झाली आहे. "प्रश्न मांडणारा नेता असावा तर असा," अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगली आहे.

सध्या जिल्हा पालकमंत्र्यांच्या प्रतीक्षेत आणि विकासाच्या मुद्द्यावर पिछाडीवर पडत असल्याची भावना जनतेत घर करत आहे. प्रलंबित सिंचन प्रकल्प, कोळसा खाणींचे प्रश्न आणि बेरोजगारी यावर तोडगा काढण्यासाठी वजनदार नेतृत्वाची गरज आहे.

**■ "सुधीरभाऊंकडे मंत्रिपद असताना जिल्ह्याचा एक दरारा होता. आज प्रशासन सुस्त झाले आहे. जिल्ह्याला पुन्हा गतवैभव मिळवून द्यायचे असेल, तर मुनगंटीवारांना मंत्रिमंडळात स्थान मिळणे ही काळाची गरज आहे," अशी प्रतिक्रिया एका ज्येष्ठ नागरिकाने व्यक्त केली. आता चेंडू राज्य सरकारच्या कोर्टात असून, येणाऱ्या काळात चंद्रपूरचा हा 'विकासाचा वनवास' संपवून सुधीर मुनगंटीवारांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी सोपवली जाणार का? याकडे संपूर्ण विदर्भाचे लक्ष लागले आहे.**

# यवतमाळात पुरवठा विभागाचा दुजाभाव

**■ बड्या हॉटेल्सना अभय तर गरिबांवर कारवाईचा बडगा, कृष्णा पुसनाके यांचा प्रशासनावर घणाघात**

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर मोठा ताण निर्माण झाला असून, याचा फायदा घेऊन होणारा काळाबाजार रोखण्यासाठी शासन स्तरावरून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मात्र, यवतमाळ शहरात पुरवठा विभागाची कारवाई अत्यंत संशयास्पद आणि पक्षपाती असल्याचे समोर येत आहे. पुरवठा विभाग कारवाईचा केवळ दिखावा करत असून, शहरातील रस्त्याच्या कडेला चहा, भजी-पाव किंवा नाश्ता विकून आपला उदरनिर्वाह करणाऱ्या छोट्या व्यावसायिकांवरच आपली सर्व शक्ती पणाला लावत आहे. दुसरीकडे, शहरातील मोठ्या पंचतारांकित हॉटेल्समध्ये होणारा गॅस पुरवठा आणि इतर साठवणुकीकडे मात्र हाच विभाग 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष करत असल्याचा खळबळजनक आरोप काँग्रेस सोशल मीडिया सेलचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके यांनी केला आहे. कृष्णा पुसनाके यांनी प्रशासनाच्या या भूमिकेवर कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत. "कायदा आणि नियम हे सर्वांसाठी समान असायला हवेत. जे व्यावसायिक रस्त्यावर उभे राहून कष्ट करतात, त्यांच्यावर कारवाईची कुऱ्हाड चालवली जाते, मात्र ज्या मोठ्या हॉटेल्समध्ये मोठ्या प्रमाणावर गॅस सिलिंडरचा वापर होतो आणि जिथे साठेबाजीची दाट शक्यता असते, तिथे प्रशासन फिरकतही नाही. हे केवळ प्रशासकीय अपयश नसून बड्या धेंडांना वाचवण्यासाठी चाललेला हा जाणीवपूर्वक प्रयत्न आहे," असे पुसनाके यांनी म्हटले आहे. पुरवठा विभागाच्या या निवडक कारवाईमुळे सर्वसामान्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, कारवाईत पारदर्शकता आणून ती सर्वांसाठी समान करण्याची मागणी त्यांनी केली आहे. जर प्रशासनाने केवळ गरिबांना लक्ष्य करणे थांबवले नाही आणि बड्या व्यावसायिकांच्या गैरव्यवहारावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला, तर या अन्यायाविरोधात तीव्र संघर्ष छेडला जाईल, असा इशाराही कृष्णा पुसनाके यांनी दिला आहे.

# भीषण अपघात; दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू, महिला गंभीर जखमी

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.**

मूर्तिजापूर-हिरपूर रोडवर सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याच्या बांधकामामुळे शुक्रवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात दोन्ही दुचाकीस्वारांचा जागीच मृत्यू झाला असून, एक महिला गंभीर जखमी झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविक्रांत तुकाराम लुंगे रा. पारवा, प्रयोगशाळा परिचर हे त्यांच्या पत्नी *सौ. केसर रविकांत लुंगे* यांच्यासह त्यांच्या दुचाकीने क्रमांक MH 37 P 2598 जितपूर खेडकर येथून आपल्या गावाकडे परतत होते. हिरपूर ते मूर्तिजापूर दरम्यान सध्या सिमेंट रस्त्याचे बांधकाम सुरू असल्याने एका



बाजूचा रस्ता वाहतुकीसाठी बंद आहे. याच दरम्यान, समोरून येणारी दुसरी दुचाकी क्रमांक MH 30 BS 5312, जिचा चालक चेतन रमेश ताटके रा. चिखली हा होता, ती रस्त्यावरील कामामुळे अचानक घसरली स्लिप झाली, आणि थेट लुंगे यांच्या दुचाकीवर जाऊन आदळली.

जीवितहानी आणि जखमी*

हा अपघात इतका भीषण होता की, यामध्ये रविक्रांत लुंगे व समोरून येणारा चालक चेतन ताटके या दोघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. रविकांत लुंगे यांच्या पत्नी केसर लुंगे या गंभीर जखमी झाल्या असून, त्यांना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी अकोला येथे हलवण्यात आले आहे.

रस्त्याच्या कामामुळे उद्भवला धोका*

हिरपूर ते मूर्तिजापूर या मार्गावर एका बाजूचे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या बाजूचे काम प्रलंबित आहे. अरुंद रस्ता आणि कामामुळे पसरलेली खडी यामुळे दुचाकी घसरल्याने हा अपघात झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# महामानव यांच्या जयंतीनिमित्त तालुक्यात शांतता समितीची सभा !

**▸विदर्भ केसरी। बाळापूर**

थोर समाजसुधारक राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले व भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंयती निमीत्य बाळापूर पोलिस स्टेशन अंतर्गत शांतता समितीच्या सभेचे आयोजन करण्यात आले. बाळापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रकाश झोडगे यानी दि ८ एप्रिल रोजी सभा घेऊन जयंती उत्सव साजरा करताना शांततेत जयंती उत्सव साजरे करुन पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले तसेच कुठल्याही प्रकाराचा अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घ्यावी दरम्यान अवैध धंदे आढळून आल्यास दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा दिला तसेच विद्युत वितरण विभागा मार्फत मिरवणूक मार्गावरील विधुत विजेचे तार सुरळीत करण्याच्या सूचना दिल्या .




बाळापूर येथे झालेल्या शांतता सभेमध्ये नायब तहसिलदार सैय्यद, विधुत विभागाचे राठोड, उपस्थित होते तर वाडेगाव येथे उपसरपंच राजेश्वर पळसकार, तंटा मुक्ती अध्यक्ष सागर सरप, प्रमोद डोंगरे, श्यामलाल लोध प्रकाश कंडारकर, वाय एस पठाण, राजपाल जंजाळ रुपेश जंजाळ, गजानन डोंगरे, राहुल धाडसे, विशाल अवाचार . दत्तात्रय लोखंडे. पत्रकार राजकुमार चिंचोळकर, राजेंद्र पल्हाडे, योगेश कडांरकार, चंदन जंजाळ . राधेश्याम कळसकार सह आदींची उपस्थिती होती अखेरीस उपस्थिताना मार्गदर्शन करताना ठाणेदार झोडगे यानी डीजे च्या च्या कर्कश आवाजाने नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवहान केले . त्यावेळी बाळापूर व वाडेगाव पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

# अडीच वर्षीय बालिकेने प्रथमच ऐकला आवाज.

सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अमरावती येथे चौथ्यांदा कॉक्लिअर इम्प्लांट 'स्विच ऑन' कार्यक्रम

**▸विदर्भ केसरी।**



स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल), अमरावती येथे कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रियेनंतर आयोजित करण्यात आलेल्या 'स्विच ऑन' कार्यक्रमात एका सुमारे अडीच वर्षांच्या बालिकेने आयुष्यात प्रथमच आवाज ऐकल्याचा अत्यंत हृदयस्पर्शी आणि भावनिक क्षण अनुभवायला मिळाला. संबंधित बालिकेची कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया दिनांक १६ मार्च 2026 रोजी यशस्वीपणे पार पडली होती. शस्त्रक्रियेनंतर नियोजित 'स्विच ऑन' कार्यक्रमादरम्यान बालिकेच्या कॉक्लिअर इम्प्लांट यंत्रणेचे अ‍ॅक्टिवेषन करण्यात आले. यंत्रणा सुरू होताच बालिकेने प्रथमच आवाजाला प्रतिसाद दिला. हा क्षण पाहताच उपस्थित पालक, वैद्यकीय कर्मचारी आणि मान्यवरांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान स्पष्टपणे दिसून आले. अनेकांसाठी हा क्षण अत्यंत भावनिक ठरला. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रक्रिया व सदर कार्यक्रम घेण्यात आला. या विशेष कार्यक्रमाला उपसंचालक, आरोग्य सेवा , अकोला डॉ. सुशील वाकचौरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार, विशेष कार्य अधिकारी व नाक, कान, घसा तज्ञ डॉ. मंगेश मेंढे तसेच ऑडिओलॉजिस्ट श्री. लक्ष्मण मोरे , अधिसेविक चंदा खोडके, डॉ. दिव्यांनी मुंदाने, डॉ.हेडाऊ,समाजसेवा अधीक्षक शितल बोंडे, ऋषिकेश धस आदी उपस्थित होते. बालिकेने प्रथमच आवाज ऐकल्याचा हा क्षण पाहून उपसंचालक डॉ.सुशिल वाकचौरे हे भारावून गेले.त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत सांगितले की, बालिकेने प्रथमच आवाज ऐकण्याचा हा क्षण अत्यंत समाधानकारक असून अशा यशस्वी उपचारांमुळे श्रवणदोष असलेल्या मुलांच्या जीवनात मोठा सकारात्मक बदल घडू शकतो.यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी कॉक्लिअर इम्प्लांटसारख्या आधुनिक उपचारपद्धतीमुळे श्रवणदोष असलेल्या मुलांना ऐकण्याची संधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले. विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांनीही अशा शस्त्रक्रिया आणि 'स्विच ऑन' कार्यक्रमांमुळे मुलांच्या पुनर्वसन प्रक्रियेला मोठी मदत होत असल्याचे नमूद केले. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत विनामूल्य करण्यात आली.

या कार्यक्रमामुळे पालकांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला असून, श्रवणदोष असलेल्या मुलांसाठी कॉक्लिअर इम्प्लांट ही उपचारपद्धती अत्यंत प्रभावी ठरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या हृदयस्पर्शी प्रसंगामुळे सुपर स्पेशालिटी रुणालय, अमरावती येथील वैद्यकीय सेवांची गुणवत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाची प्रभावीता अधोरेखित झाली असून, भविष्यातही अशा रुग्णांना उत्तम सेवा देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

# मुर्तिजापूर बोरिंगच्या पाण्यावरून वाद.

## तरुणावर लोखंडी पाईपने हल्ला, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल.

**▸विदर्भ केसरी। मुर्तिजापूर प्रतिनिधी.**

शहरातील पठाणपुरा भागात बोरिंगच्या पाण्यावरून झालेल्या वादाचे पर्यवसान हाणामारीत झाले असून, एका तरुणावर लोखंडी पाईपने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मुर्तिजापूर पोलिसांनी तीन आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (BNS) विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अब्दुल समीर अब्दुल सामद वय २२, रा. पठाणपुरा यांचा भाऊ आणि जशीमोद्दीन यांच्यात बोरिंगच्या पाण्यावरून वाद झाला होता. या वादाची तक्रार पोलिसांत दिली होती. तक्रार



देऊन घरी परतत असताना, ९ एप्रिल रोजी रात्री ८:३० वाजेच्या सुमारास आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या भावाला अडवून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

लोखंडी पाईपने हल्ला

या वादात आरोपी क्र. ०२ अब्दुल कामील अब्दुल कलाम* याने फिर्यादीच्या भावाच्या डोक्यावर लोखंडी पाईपने प्रहार केला, ज्यामुळे तो गंभीर जखमी झाला. तसेच आरोपी क्र. ०३ शहनाज बी हिने फिर्यादीच्या आई आणि बहिणीला मारहाण करून शिवीगाळ केली, तर आरोपी क्र. ०१ *शाकीरोद्दीन शफीउद्दीन याने "तुमको देख लुंगा" अशी धमकी दिली.

फिर्यादीच्या जबानीवरून आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारावर मुर्तिजापूर पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे:

दाखल गुन्हा क्र. ३६३/२०२६

कलमे:११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) BNS २०२३.

आरोपी शाकीरोद्दीन शफीउद्दीन, अब्दुल कामील अब्दुल कलाम आणि शहनाज बी. विशेष म्हणजे, आरोपी क्रमांक दोन (अब्दुल कामील) याच्यावर यापूर्वीही कलम ४२९, ५०४, ५०६ आणि मोटार वाहन कायद्यांतर्गत गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल लोणकर (ब.नं. २७२) हे करीत आहेत. गुन्ह्याची नोंद *हेड कॉन्स्टेबल प्रभाकर ब.नं. १५२४ यांनी केली आहे.

# आरक्षणाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी 'उपवर्गीकरण' आवश्यक

## हिंदू दलित संघाचा अकोल्यात एल्गार.

**▸विदर्भ केसरी। अकोला**



अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे लाभ समाजातील शेवटच्या, गरीब आणि वंचित घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी आरक्षणाचे उपवर्गीकरण होणे काळाची गरज आहे. हा लढा केवळ एका जातीचा नसून संपूर्ण दलित समाजाच्या न्याय्य हक्कासाठी आहे, असे प्रतिपादन हिंदू दलित संघाचे अध्यक्ष संजयभाऊ धनाडे यांनी केले. अकोला येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित हिंदू दलित संघटनेच्या विशेष बैठकीत ते बोलत होते.

मुख्यमंत्री व प्रशासकीय समितीचे स्वागत*

सुप्रीम कोर्टाच्या ऐतिहासिक निर्णयानुसार, महाराष्ट्र सरकारने आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी पावले उचलली आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीचे बैठकीत स्वागत करण्यात आले. या समितीला जास्तीत जास्त समाजघटकांनी सहकार्य करून उपवर्गीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबत निवेदने द्यावीत, असे आवाहन यावेळी करण्यात आले. वंचितांना न्याय मिळवून देण्याचा निर्धार**

हिंदू दलित संघाचे उपाध्यक्ष उमेश लखन यांनी मांडले की, अनेक समाजघटकांना अद्याप आरक्षणाचे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक फायदे मिळालेले नाहीत. ज्यांना आजवर लाभ मिळाला नाही, त्यांच्यापर्यंत आरक्षण पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. संघाचे सरचिटणीस गवई पाटील यांनी राष्ट्रीय चर्मकार संघाने या उपवर्गीकरणाच्या लढ्यात सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच, संघाचे प्रचारक बाळकृष्ण गायकवाड यांनी आरक्षणाच्या कायदेशीर आणि तांत्रिक मुद्द्यांवर विस्तृत माहिती देऊन सर्व मागासवर्गीयांनी संघटित होण्याचे आवाहन केले. या बैठकीत अयोध्या येथील श्रीराम मंदिर गर्भगृहाच्या चौकटीचे प्रथम पूजन केल्याबद्दल वाल्मिकी समाजाचे चौधरी गुरुजी सारवान यांचा विशेष गौरव करण्यात आला.

बैठकीला संजयभाऊ धनाडे (अध्यक्ष, हिंदू दलित संघ) उमेश लखन (उपाध्यक्ष) गवई पाटील सरचिटणीस बाळकृष्ण गायकवाड (प्रचारक) सतपाल अलंकार, आकाश सावते व इतर पदाधिकारी. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन जिल्हा प्रचारक बाळासाहेब गायकवाड यांनी केले. उपवर्गीकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत हिंदू दलित समाजातील सर्व घटकांनी वेळोवेळी संघटित राहावे, असा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# आठवडी बाजारात चोरट्यांचा सुळसुळाट



**■ आठवडी बाजाराच्या दिवशी बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून या गर्दीच्या फायदा चोरटे घेत असतात तरी नागरिकांनी आपल्या जवळील पैशाची मोबाईलची व मौल्यवान वस्तूंची काळजी घेणे महत्त्वाचे ठरते मौल्यवान वस्तू सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी नेऊ नये -ठाणेदार सुनील वानखडे दर्यापूर**

## चार मोबाईल फोन लंपास

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर :**

शहरातील गुरुवारी भरणाऱ्या आठवडी बाजारात चोरट्यांनी पुन्हा एकदा हात साफ केल्याची घटना समोर आली आहे. बाजारातील गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने स्वप्नील रावसाहेब पोटे गजानन रामदास नवलकर खुरमाबाद मोहम्मद अब्रार दर्यापूर सागर पवित्रकार लासुर या चार नागरिकांचे चालू असलेले मोबाईल फोन लंपास केल्याची घटना घडली.

आठवडी बाजारात खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होत असते. याच गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी नागरिकांना लक्ष्य केले असून मोबाईल चोरीच्या घटना वाढत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकारामुळे बाजारात येणाऱ्या नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, तसेच अशा घटनांवर आळा घालण्यासाठी संबंधित प्रशासनाने बाजार परिसरात पोलीस गस्त वाढवावी व सीसीटीव्हीची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

वृत्त लिहिस्तोर चोरट्या विरुद्ध गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती

## केबल चोरट्याला रंगेहात पकडले

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

शेतातील केबल चोरुन नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या चोरट्याला शेतकऱ्याने रंगेहात पकडले. हा प्रकार पुसद तालुक्यातील कासोळा शेतशिवारात ९ एप्रिल रोजी उघडकीस आला. शेतकरी ओंकार बापूराव पांगरकर (३५) रा. पिंपळगाव ता. महागाव यांचे कासोळा शिवारात शेत आहे. तेथे त्यांनी शेतीच्या सिंचनासाठी सोय केली आहे. त्यासाठी केबलची व्यवस्था करण्यात आली आहे. दरम्यान ९ एप्रिल रोजी भारत सीताराम कोकाटे (२२) रा. कासोळा हा इसम शेतात आला आणि त्याने केबल ओढून चोरुन नेण्याचा प्रयत्न सुरु केला. ही बाब शेतकऱ्याच्या लक्षात येताच त्यांनी कोकाटे याला रंगेहात पकडले. त्यानंतर ओंकार पांगरकर यांनी पुसद ग्रामीण पोलिस ठाण्यात या प्रकरणी तक्रार दाखल केली. त्यावरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अंतिम उद्दिष्ट, जाती व्यवस्थेचा समूळ नाश! : प्रा. डॉ. रतनलाल




**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

बाबासाहेबांचे अंतिम उद्दिष्ट होते जातीव्यवस्थेचा समूळ नाश आजच्या संदर्भात पाहिल्यावरच ते समर्पक ठरते. बाबासाहेबांनी नेहमीच एका ध्येयाचे स्वप्न पाहिले होते. आजही अल्पसंख्याक समाजाला बहुजन म्हटले जाते, अनेक संस्था चालवणारे अनेक नेते बहुजन म्हणत आहेत परंतु कोणीही त्याचे मूल्यांकन करत नाही.जोपर्यंत तुम्ही तसे करत नाहीत, तोपर्यंत तुम्हाला मार्ग दिसणार नाही. बाबासाहेब, कार्ल्स मार्क्स, बुद्ध, फुले हे सर्व महापुरुष एका ध्येयाने प्रेरित होते. बाबासाहेबांचे ध्येय काय आहे? आजकाल कोणते प्रश्न महत्त्वाचे आहेत परंतु खरं बोलण्यासाठी अनेक लोक घाबरतात कारण काय? तर खटला भरला जाईल केसेस होतील या भीतीने लोक बोलत नाहीत.बोलताना पुढे म्हणाले की आम्ही सुद्धा अल्पसंख्याक आहोत, आरक्षण हा त्यांचा आधार होता, मी सरळ दलित समाजाला उद्देशूनच बोलतो परंतु आम्ही त्यांना बहुजन बनवत आहोत,बाबासाहेबांनी जातीव्यवस्था नष्ट करण्याचे वचन दिले होते, परंतु आपण मात्र जाती व्यवस्था अधिक मजबूत करत आहोत.सर्वात मोठी गोष्ट म्हणजे बाबासाहेबांचे आयुष्यभर असलेले बहुआयामी लक्ष म्हणजे अस्पृश्यता निर्मूलन होते. गांधी आणि आंबेडकर यांच्या मध्ये हाच फरक होता की गांधी अस्पृश्यता निर्मूलन करण्यासाठी प्रयत्नशील होते परंतु जातिव्यवस्थेचा समूळ नाश करणे हे बाबासाहेबांचे अंतिम ध्येय हे उद्दिष्ट होते.

संपूर्ण राष्ट्रीय जीवनामध्ये आम्ही अल्पसंख्याक आहोत यासाठी आम्हाला राष्ट्रीय सुरक्षा पाहिजे आणि त्याचा आधार रिझर्वेशन होते.असे महत्त्वपूर्ण विश्लेषण आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख इतिहास अभ्यासक प्रा. डॉ. रतनलाल (दिल्ली) धम्मक्रांती प्रज्ञापर्व कार्यक्रमात तिसरे पुष्प गुंफताना बोलत होते.

**■ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमाकांत कांबळे ( उपविभागीय अभियंता) हे होते तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून राजूभाऊ दुधे, दिनकर गुल्हाने, अनिरुद्ध पाटील, शितल कुमार वानखेडे, डॉ.अमोल मालपाणी, डॉ. शिवाजी भुरके,,डॉ. राहुल भगत, प्रा. नरेंद्र जाधव नंदकिशोर जयस्वाल,धम्मक्रांती प्रज्ञापर्वाचे अध्यक्ष प्रा.सुनील खाडे यांच्या सह विचारपीठावर अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषाच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संबोधी महिला मंडळ श्रावस्ती नगर, व पंचशील महिला मंडळ यांच्या वतीने सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण ठोके यांनी केले आभार संतोष गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमाला तालुक्यातील बहुसंख्येने धम्म बांधव,महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## महत्त्वाचे

## आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



पुसद: दिनांक १०/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र शासन आदिवासी विभाग अंतर्गत आदिवासी समाजातील मुलामुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे तसेच आर्थिक मदत म्हणून दरवर्षी सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती मिळत असते त्याअनुषंगाने शाळेत शिष्यवृत्तीच्या धनादेश वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय श्री विठ्ठल खडसे सर शिक्षण सभापती होते तर प्रमुख अतिथी सुनील जाधव नपा व मनपा महाराष्ट्र शिक्षक संघाचे राज्यध्यक्ष उपस्थित होते सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मनोभावे पुजन करून पुष्पहार अर्पण केले त्यानंतर श्री विठ्ठल खडसे सर यांनी आपल्या मनोगतामध्ये महाराष्ट्र शासनाकडून शाळेला ज्या ज्या सोयी सुविधा गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी मिळतात त्यांचे सर्व श्रेय हे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना दिले जाते आपण सर्वांनी शासनाकडून मिळालेल्या गोष्टींचा योग्य वापर केला पाहिजे असे विद्यार्थ्यांना आव्हान केले व शेवटी आपल्या शुभ हस्ते विद्यार्थ्यांना आपल्या पालकासमवेत धनादेश चे वितरण केले याप्रसंगी गजानन अंभोरे कन्या शाळा क्र २ चे मुख्याध्यापक व आदरणीय ओमप्रकाश तिवारी सेवानिवृत्त मुख्याध्यापक उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक के. डी. डाखोरे यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका अर्चना म्हैसकर मडम व पुष्पा सिहोतिया मडम यांनी परिश्रम घेतले

## आज प्रा. विठ्ठल कांगणे यांचे व्याख्यान व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.**



येथील जी.के. अकॅडमीच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त भव्य जाहीर व्याख्यान व यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा परीक्षा आणि आजचा विद्यार्थी' या विषयावर प्रसिद्ध व्याख्याते *प्रा. विठ्ठल कांगणे सर मार्गदर्शन करणार असून, हा सोहळा शनिवारी, ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता राधा मंगलम, तिडके नगर येथे पार पडणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य सभापती मायाताई संजय नाईक राहणार असून, उद्घाटन माजी तालुकाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी संजय नाईक यांच्या हस्ते होणार आहे.
या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्रीधर गुट्टे,ऑर्बिट डोळ्यांच्या दवाखान्याचे डॉ. जगदीश वानखडे क्रीडा शिक्षक ज्ञानेश ताले* व जी.के. अभ्यासिकेचे गजानन वरघट* यांची उपस्थिती लाभणार आहे.

**■ विद्यार्थ्यांचा होणार गौरव**

केवळ व्याख्यानच नव्हे, तर विविध क्षेत्रांत व स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार केला जाणार आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व पालकांनी या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जी.के. अकॅडमीचे संचालक रवि ना. गोंडकार यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा समिती, मूर्तीजापूर स्वच्छता अभियान व शहरातील विविध सामाजिक व क्रीडा संस्थांनी केले आहे.

## सोलर प्लांटवरुन ७२ हजारांचा वायर चोरला

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

सोलर प्लांटवरुन तब्बल ७२ हजार रुपयांचा कॉपर वायर चोरट्यांनी लंपास केला. ही चोरी नेर तालुक्यातील बाणगाव येथे ४ ते ५ एप्रिलदरम्यान घडली. येथे आवादा सोलर कंपनीने सोलर प्लांट सुरु केला आहे. तेथे सोलर पॅनलवर बसविलेला कॉपर वायर चोरीस गेला आहे. या प्रकरणी प्रवीण बाबाराव मनवर (४५) रा. छत्रपतीनगर नेर यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यावरुन नेर पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा नोंदविला आहे.

## पावणे तीन लाखांचे केबल लंपास

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

सोलर पॅनलला लागलेले तब्बल २ लाख ८० हजार रुपयांचे एसी व डीसी केबल अज्ञात चोरट्याने लंपास केले. ही चोरी दारव्हा तालुक्यातील सारंगपूर परिसरात २९ मार्च ते १ एप्रिल या दरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे. या ठिकाणी सोलर पॅनलला ८ हजार मिटर लांबीचे एसी व डीसी केबल बसविण्यात आले होते. मात्र हे पावणेतीन लाख किमतीचे केबल चोरट्यांनी लंपास केले.

## भिम जयंतीच्या काळात रिसोडमध्ये 'ड्राय डे' पाळा ; वंचित बहुजन आघाडीची मागणी

**▸विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी-**



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती रिसोड शहरासह तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या उत्सवाच्या काळात सामाजिक सलोखा कायम राहावा आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये,यासाठी १४ आणि १५ एप्रिल रोजी संपूर्ण तालुक्यात 'ड्राय डे' पाळून दारू विक्री अधिकृतपणे बंद ठेवावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.यासंदर्भातील एक लेखी निवेदन शुक्रवारी रिसोड पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांना सादर करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रिसोड तालुक्यातील विविध गावांमध्ये मिरवणुकांचे आयोजन केले जाते.काही गावांमध्ये १४ एप्रिलला,तर काही ठिकाणी प्रशासनाच्या परवानगीने १५ एप्रिलला भव्य मिरवणुका निघतात. या मिरवणुकांमध्ये हजारो भिम अनुयायी आणि नागरिक सहभागी होतात. अशा मोठ्या गर्दीच्या ठिकाणी उत्साहाला गालबोट लागू नये आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये,यासाठी पोलीस प्रशासनाने खबरदारी घेणे गरजेचे आहे.मद्यप्राशन करून काही समाजकंटक शांतता भंग करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून हे दोन दिवस तालुक्यातील सर्व देशी-विदेशी दारूची दुकाने व विक्री केंद्रे पूर्णपणे बंद ठेवण्यात यावीत, अशी आग्रही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन देताना वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष महेश विठ्ठल तिडके,जिल्हा महासचिव प्रा. रंगनाथ धांडे,जिल्हा उपाध्यक्ष शालीग्राम पठाडे,माजी शहराध्यक्ष प्रदिप वसंतराव खंडारे, शहर महासचिव जियाउर खान,तालुकाध्यक्ष (भा. बौ.म.) माधवराव हिवाळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मंदाताई धांडे, मंदाताई वाघमारे, कैलास पंडित, प्रकाश गवई, कैलास जुमडे, शुभम जुमडे, गुलाब मस्के, प्रल्हादजी भगत आणि शेख वसीम,या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.पोलीस प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन जयंती उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी भावना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## सोनाळा ग्रामपंचायत भरती प्रकरणी चौकशीची मागणी




**▸विदर्भ केसरी। संग्रामपूर।**

तालुक्यातील सर्वात मोठ्या सोनाळा ग्रामपंचायतेमध्ये झालेल्या कर्मचारी भरती प्रकरणी युवकशक्ती ग्रामविकास संघटनेने निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

संघटनेने जिल्हा परिषद बुलढाणा येथील मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांना ६ एप्रिल सोमवार रोजी दिलेल्या निवेदनात आरोप केला आहे की, संबंधित भरती प्रक्रिया शासनाच्या नियमांनुसार पारदर्शक पद्धतीने राबविली गेली नाही. निवेदनानुसार, नियुक्तीसाठी कोणतीही सार्वजनिक जाहिरात प्रसिद्ध केलेली नव्हती, इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया राबविली गेली नाही आणि निवड प्रक्रियेत गुणांकन पद्धती, लेखी परीक्षा किंवा मुलाखत यांसारख्या अधिकृत प्रक्रियेचा अवलंब केलेला नव्हता. यामुळे, संघटनेच्या मते, ही प्रक्रिया पारदर्शकतेच्या तत्त्वांना बाधक ठरली आहे. 'आपले सरकार' पोर्टलवरील माहितीप्रमाणे कोणतीही नवीन भरती प्रक्रिया जाहीर नसली तरी प्रत्यक्षात नियुक्ती झाल्याचा विरोधाभासही निवेदनात नमूद करण्यात आला आहे. युवकशक्ती ग्रामविकास संघटनेने प्रकरणाच्या कायदेशीर तरतुदींचा संदर्भ देत सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित ग्रामसेवक निलंबित ठेवावा आणि दोषी आढळल्यास योग्य प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## दहावीच्या निकालापूर्वीच अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

दहावीच्या परीक्षांचे निकाल अजून घोषित व्हायचे असतानाच यंदा इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेला १० एप्रिलपासून अधिकृतपणे सुरुवात करण्यात आली आहे. शुक्रवारपासून विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशाचा ऑनलाइन नोंदणीचा पहिला टप्पा खुला करण्यात आला आहे. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी 'प्रवेश अर्जाचा भाग १' भरून स्वतःची नोंदणी करणे अनिवार्य आहे. तर दहावीच्या निकालानंतर अर्जाचा दुसरा भाग भरून प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. मागील वर्षाप्रमाणेच यंदाही अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबवली जात आहे. अकरावीमध्ये विद्यार्थ्यांचे अर्ज अचूक आणि त्वरित भरण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी शासकीय, अनुदानित विद्यालयांमध्ये मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. गेल्या वर्षी प्रथमच राज्यभरात अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात आली. मात्र, प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यास विलंब झाल्याने अकरावीची प्रवेश प्रक्रिया सप्टेंबरपर्यंत सुरू राहिली. त्यामुळे यंदा दक्षता घेत लवकर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शेवटच्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळेपर्यंत प्रवेश प्रक्रिया गुणवत्तेनुसार आणि निकषांनुसार ऑनलाइन पद्धतीनेच करण्यात येईल. याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही पद्धतीने शाळांना प्रवेश करता येणार नाही.

## आत्मविश्वासाने यशाची शिखरे पादाक्रांत करा

### डॉ. आय. पी. पवार : मधुकरराव पवार कला महाविद्यालयात 'पदवी प्रदान समारंभ' उत्साहात

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



येथील मधुकरराव पवार कला महाविद्यालयात* गुरुवार, ९ एप्रिल २०२६ रोजी पदवी प्रदान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. उन्हाळी सत्र २०२२ आणि २०२३ मध्ये बी.ए. उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी देऊन गौरविण्यात आले. अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात हा सोहळा पार पडला दुपारी १२ वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात या सोहळ्याला प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. एस. बंडगर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य प्रा. एस. एस. तायडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना उपप्राचार्य डॉ. आय. पी. पवार यांनी विद्यार्थ्यांना पदवीचे जीवनातील महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, केवळ पदवी मिळवणे हे ध्येय नसून, प्राप्त शिक्षणाचा उपयोग समाजाच्या हितासाठी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आयुष्यात जिद्द, चिकाटी, संयम आणि आत्मविश्वास हे गुण आत्मसात केल्यास कोणतेही संकट त्यांना रोखू शकणार नाही."

यावेळी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील पाली व प्राकृत अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. एस. मानवटकर यांनीही विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत मोलाचे मार्गदर्शन केले. २०२२ आणि २०२३ च्या उन्हाळी सत्रात बी.ए. पदवी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्राचार्य व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रे सुपूर्द करण्यात आली. आपल्या कष्टाचे फळ हाती आल्याचा आनंद यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. या सोहळ्याला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल व्यवस्थापनाने सर्वांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. आर. आर. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ढाणकी–टेंभुरदरा राज्यमार्ग की मृत्यूचा सापळा?

### साईडपट्ट्यांअभावी वाहने जातायत थेट नालीत! दोन वर्षांतच रस्त्याची दैना; लोकप्रतिनिधींच्या 'मौना'मुळे ग्रामस्थांचा संताप

**▸विदर्भ केसरी। ढाणकी: (प्रतिनिधी) मिलिंद चिकाटे**



तेलंगणा राज्याला जोडणारा मुख्य दुवा असलेला ढाणकी-खरुस-टेंभुरदरा-कुरळी हा 233 क्र.राज्यमार्ग सध्या प्रवाशांसाठी 'यमलोक' ठरत आहे. अवघ्या दोन वर्षांपूर्वी या रस्त्याचे काम झाले असूनही, निकृष्ट दर्जा आणि अरुंद रस्ता यामुळे अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाही. रस्त्याच्या कडेला साईडपट्ट्याच भरल्या नसल्याने समोरून वाहन आल्यास जागा देताना वाहने थेट नालीत कोसळत आहेत. प्रशासनाच्या या निष्काळजीपणामुळे ग्रामस्थांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत असून आता रस्त्याच्या दुहेरीकरणासाठी येणाऱ्या काळात आंदोलनाचा पवित्रा घेण्यात येऊ शकते .

हा मार्ग आंतरराज्यीय वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, वाढलेली अवजड वाहतूक आणि रस्त्याची अत्यंत कमी असलेली रुंदी यामुळे ओव्हरटेक करणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण देण्यासारखे झाले आहे. ओव्हरटेकच्या नादात दररोज छोटे-मोठे अपघात होत असून रक्ताचे सडे पडत आहेत. रस्ता रुंद झाल्यास हे अपघात ५० टक्क्यांनी कमी होतील, असा विश्वास वाहनधारकांनी व्यक्त केला आहे. रस्त्याचे काम नवीन असतानाही कडेला मुरूम टाकून साईडपट्ट्या भरण्याचे काम करण्यात आलेले नाही. परिणामी, मोठी वाहने समोरून आल्यावर दुचाकीस्वारांना जागा मिळत नाही आणि त्यांची वाहने थेट रस्त्याला लागून असलेल्या खोल नालीत जात आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग (उमरखेड) याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

**■ ढाणकी-खरुस दरम्यान असलेला नाला हा प्रवाशांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. येथील पुलाची उंची अत्यंत कमी असल्याने थोडा जरी पाऊस झाला की पुलावरून पाणी वाहू लागते. परिणामी, तासनतास वाहतूक ठप्प होते. रस्ता राज्यमार्ग असूनही या पुलाच्या उंचीबाबत अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. गेल्या पावसाळ्यामध्ये धानकीला शाळेत गेलेल्या मुली या पुलावर पाणी असल्यामुळे दोन दिवस शाळेतच मुक्कामी होत्या त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने ढाणकी जवळ असलेल्या नाल्याच्या पुलाची उंची वाढवणे गरजेचे असल्याचे नागरिक बोलत आहे**

**■ या गंभीर प्रश्नावर स्थानिक नेतेमंडळी आणि लोकप्रतिनिधींनी सोयीस्कर मौन पाळल्याचे चित्र आहे. सामान्य जनतेचे जीव जात असतानाही राज्यकर्ते गप्प का? असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. या मार्गाचे तातडीने दुहेरीकरण आणि पुलाची उंची वाढवण्यात यावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी नेते मंडळाला बोलून दाखवत आहे.**

## भीमगर्जना सोहळ्यात उन्हाचा 'तडाखा' टाळण्यासाठी 'आरोग्य कवच' उभारा!



■ डॉ. माया हिवाळेंचे प्रशासनाला साकडे

**▸विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी -प्रदिप खंडारे**

**■ अभिवादन रॅलीत जनसमुदाय मोठा असतो. उत्साहाच्या भरात आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ शकते. कोणतीही जीवितहानी टाळण्यासाठी प्रशासनाने 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळतील, असे नियोजन करणे गरजेचे आहे."**
**-डॉ. माया हिवाळे (जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त)**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त निघणाऱ्या भव्य रॅलीत सहभागी होणाऱ्या लाखो अनुयायांच्या सुरक्षेसाठी विशेष आरोग्य पथके तैनात करण्याची मागणी जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त डॉ. माया हिवाळे यांनी केली आहे. वाढता उन्हाळा आणि उष्माघाताचा धोका पाहता, प्रशासनाने 'अलर्ट मोड'वर राहावे, असे आवाहन त्यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सकांना केले आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही १४ एप्रिल रोजी वाशिम शहरात भिम जयंतीचा मोठा उत्साह असून,रॅलीमध्ये अबालवृद्धांचा मोठा सहभाग राहणार आहे. सध्या तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जात असल्याने उष्माघात आणि निर्जलीकरण यांसारखे धोके संभवतात. गर्दीत ज्येष्ठ नागरिक आणि बालकांना त्रास होऊ नये,यासाठी तातडीची वैद्यकीय मदत मिळणे अत्यावश्यक असल्याचे डॉ. हिवाळे यांनी स्पष्ट केले. कार्डियाक ॲम्बुलन्सः रॅली मार्गावर तातडीच्या उपचारासाठी १ ते २ सुसज्ज 'आयसीयू रुग्णवाहिका' तैनात ठेवाव्यात.मुख्य चौकात किंवा गर्दीच्या ठिकाणी 'मेडिकल कॅम्प'उभारून तिथे तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करावी.

**■ ओआरएस पाकिटे,ग्लुकोज आणि प्रथमोपचार साहित्याचा पुरेसा साठा उपलब्ध असावा. आपत्कालीन स्थिती हाताळण्यासाठी प्रशिक्षित परिचारिका व कर्मचाऱ्यांचे पथक सज्ज ठेवावे.**

Selected

## सिरोंचा–रेपेनपाली राष्ट्रीय महामार्गावरील पुलिया कामांजवळ सुरक्षा उपाययोजनांची मागणी



सिरोंचा :- सिरोंचा ते रेपेनपाली राष्ट्रीय महामार्गावर सध्या रस्त्याचे व पुलिया (लहान पूल) बांधकामाचे काम सुरू असून संबंधित ठिकाणी कोणतेही सूचना फलक किंवा सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय कम्युनिस्ट पार्टी (भाकाप)चे तालुका सचिव रवि बारसागंडी यांनी तहसीलदार यांना निवेदन सादर करून तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महामार्गावर मध्ये-मध्ये पुलिया बांधकाम सुरू असताना “काम सुरू आहे” असे इशारा फलक, दिशादर्शक चिन्ह, बॅरिकेड्स किंवा परावर्तक टेप लावण्यात आलेली नाही. विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनचालकांना काम सुरू असल्याची कोणतीही पूर्वकल्पना मिळत नसल्याने अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. शालेय विद्यार्थी, दुचाकी व चारचाकी वाहनचालक तसेच पादचारी नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सदर काम करणाऱ्या ठेकेदार व संबंधित विभागाने नियमांनुसार आवश्यक सूचना फलक, प्रतिबंधक बॅरिकेड्स, रात्रीसाठी प्रकाश व्यवस्था व इतर सुरक्षा उपाययोजना तात्काळ कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी व भविष्यात कोणताही अपघात होऊ नये यासाठी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या गंभीर बाबीकडे प्रशासनाने त्वरित लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## स्वीकृत नगरसेवक पदासाठी ‘घंटानाद’ आंदोलन

पिंपरी : पिंपरी -चिंचवड महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक पदावर नियुक्ती व्हावी या मागणीसाठी भारतीय जनता पक्षाच्या जुन्या कार्यकर्त्यांकडून आता अनोख्या आंदोलनाची तयारी सुरू झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालय व ‘वर्षा’ निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन ‘घंटा भेट’ देत आपल्या भावना व्यक्त करण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनी घेतला आहे. शहरातील जुन्या कार्यकर्त्यांना स्वीकृत नगरसेवक पदावर संधी देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात येणार आहे. अनेक वर्षे पक्ष संघटनेसाठी काम करूनही योग्य संधी मिळत नसल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढली आहे. कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, पिंपरी-चिंचवड शहरातील विविध नागरी समस्या सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने मोर्चे, आंदोलने केली. या आंदोलनांमुळे अनेक वेळा त्यांच्यावर पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हेही दाखल झाले. अशी खंत व्यक्त होत आहे. विशेषतः प्रभाग क्रमांक 13 मध्ये 2017 साली भाजपचे दोन नगरसेवक निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी मोठे प्रयत्न केले होते. आगामी निवडणुकीत तीन नगरसेवक निवडून आणण्यासाठीही त्यांनी जोरदार तयारी केली. मात्र, त्यानंतरही स्वीकृत नगरसेवक पदासाठी त्यांची दखल घेतली जात नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. कार्यकर्त्यांनी असा आरोपही केला आहे की, इतर पक्षांमध्ये — विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गट आणि शरद पवार गटात — नवीन कार्यकर्त्यांना निवडणुकीत तिकीट देण्यात येत आहे, तर जुन्या कार्यकर्त्यांना संघटनात्मक कामासाठीच थांबवले जात आहे. याशिवाय शहरातील काही प्रमुख नेते — शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, अमित गोरखे — हे जुन्या कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष करत असल्याची नाराजीही व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर 13 एप्रिल 2026 रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन ‘घंटा भेट’ देण्यात येणार असून, कार्यकर्त्यांच्या भावना थेट त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# ग्रामसेवकाची बनावट 'आयडी' वापरून घरकुल लाभार्थ्यांच्या वाळूवर डल्ला..!

## ४०० ब्रास वाळू उपसा गैरव्यवहारामुळे महसूल विभागावर गंभीर आरोप..!

विदर्भ केसरी । कुरखेडा

प्रशासकीय यंत्रणेचा गैरवापर आणि शासकीय नियमांची पायमल्ली कशा प्रकारे केली जाऊ शकते, याचे धक्कादायक उदाहरण कुरखेडा तालुक्यात उघडकीस आले आहे. घरकुल लाभार्थ्यांसाठी राखीव असलेली वाळू जिल्हाधिकाऱ्यांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता चक्क एका खासगी कंत्राटदाराच्या घशात घालण्यात आली आहे. विशेष म्हणजे, यासाठी एका ग्रामसेवकाची बनावट महाखनिज आयडी वापरून ४०० ब्रास वाळू उपसा केल्याचा प्रकार समोर आला असून, यात महसूल विभागाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. माहिती अधिकारातून घोटाळा उघड: माहिती अधिकारात मिळालेल्या पुराव्यांनुसार, गुरनोली येथील सती नदी पात्रातून वाळू उपसा करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेची सर्व सूत्रे कंत्राटदाराच्या फायद्यासाठी वापरण्यात आली. महाखनिज पोर्टलवर एका ग्रामसेवकाची बनावट युजर आयडी तयार करून त्याद्वारे ४०० ब्रास वाळू उचलण्याची प्रक्रिया पार पाडली गेली. ज्या ग्रामपंचायतीच्या नावावर ही आयडी तयार झाली,




त्या ग्रामपंचायतीला वाळूचा अर्ज किंवा भरलेल्या ३ लाख रुपयांच्या महसुलाबाबत कोणतीही कल्पना नसल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. हा सर्व खटाटोप दिल्लीस्थित एका कंत्राटदाराला लाभ पोहोचवण्यासाठी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. तहसीलदारांच्या भूमिकेवर संशय राज्य शासनाच्या नवीन वाळू धोरण २०२५ नुसार घरकुल लाभार्थ्यांना प्राधान्याने रेती मिळणे अपेक्षित असतांना, येथे मात्र कंत्राटदारासाठी पायघड्या घातल्या गेल्या आहेत. कुरखेडाचे तहसीलदार राहुल पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी न घेताच वाळू उपशाचे परवाने दिल्याने त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. कंत्राटदाराच्या बेकायदेशीर कृत्याला महसूल विभागाचे पाठबळ लाभल्यानेच हा उपसा सुरू असल्याचा आरोप आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष नासीर हाश्मी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केला आहे. फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी: या प्रकरणाची विभागीय चौकशी करून दोषी महसूल कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, तसेच संबंधित कंत्राटदाराकडून दुप्पट दंड वसूल करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत तहसीलदार राहुल पाटील यांना विचारणा केली असता, त्यांनी असे काही घडू शकत नाही असे सांगत अधिक बोलणे टाळले आणि नायब तहसीलदारांकडे बोट दाखवून या प्रकरणावर प्रतिक्रिया देणे टाळले. आता या प्रकरणात जिल्हा प्रशासन काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## लाखो रुपये खर्चून आणलेली घंटा गाडी ठरली शोभेची वस्तू – कारवाईची मागणी

विदर्भ केसरी । सिरोंचा




तालुक्यातील ग्रामपंचायत जप्राबाद अंतर्गत लाखो रुपये खर्च करून खरेदी करण्यात आलेली घंटा गाडी सध्या केवळ शोभेची वस्तू बनून उभी असल्याचे समोर आले आहे. गावातील स्वच्छता व्यवस्थेसाठी ही गाडी आणण्यात आली होती, मात्र प्रत्यक्षात ती नियमित वापरात नसल्याने गावात कचऱ्याचे ढीग साचले असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर रवि बारसागंडी, भाकपा (भारतीय कम्युनिस्ट पक्ष) सिरोंचा तालुका सचिव यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत खालील मागण्या केल्या आहेत.

घंटा गाडी तात्काळ सुरू करून नियमित कचरा संकलन करावे. संबंधित ग्रामसेवक व जबाबदार अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण घ्यावे, खर्च झालेल्या निधीची चौकशी करून अहवाल जाहीर करावा,जर प्रशासनाने तात्काळ कारवाई केली नाही, तर भाकपाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही रवि बारसागंडी यांनी दिला आहे.

## भामरागड नगरपंचायत कारभारात हस्तक्षेपाचा आरोप; नगराध्यक्षांच्या पतीविरोधात सदस्यांचे निवेदन

विदर्भ केसरी । गडचिरोली



भामरागड नगरपंचायतीच्या कामकाजात अनधिकृत हस्तक्षेप होत असल्याचा गंभीर आरोप करत नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर केले आहे. नगराध्यक्षा श्रीमती रामबाई कोमटी महाका यांचे पती श्री. तपेश हलदार हे नियमितपणे नगरपंचायतीच्या सभांमध्ये हस्तक्षेप करत असून कार्यालयीन कामकाजातही ढवळाढवळ करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनानुसार, संबंधित व्यक्ती सभेदरम्यान निर्णय प्रक्रियेत हस्तक्षेप करत असल्याने निवडून आलेल्या सदस्यांच्या अधिकारावर गदा येत आहे. तसेच, सदस्यांची संमती न घेता बांधकाम कामांचे लोकेशन परस्पर बदलून कंत्राटदारांवर दबाव टाकल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याची भावना सदस्यांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी मुख्याधिकारी, नगरपंचायत भामरागड यांच्याकडे करण्यात आली आहे. यावेळी नगरउपाध्यक्ष श्री. विष्णू मडावी, श्रीमती तेजस्विनी कोरके, बांधकाम सभापती श्रीमती कविता येतकमवर, स्वच्छता व आरोग्य सभापती श्रीमती सच्चीरेखा आत्राम, महिला व बालकल्याण सभापती श्रीमती ललिता पुंगाटी तसेच अन्य नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, या तक्रारीमुळे भामरागड नगरपंचायतीत राजकीय वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात असून प्रशासन पुढील काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आरमोरी येथे ‘पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान-२०२६’ संपन्न

विदर्भ केसरी । देसाईगंज

पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान-२०२६ अंतर्गत भारतीय जनता पक्षाच्या आरमोरी मंडलातर्फे बल्लारपुरे हॉल, नवीन बसस्टॉपसमोर येथे ८ व ९ एप्रिल रोजी दोनदिवसीय निवासी कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली. या शिबिरातील ‘आपल्या सरकारची कामगिरी’ या सत्रात माजी आमदार कृष्णाजी गजबे यांनी प्रेरणादायी भाषण केले.

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील केंद्र व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांचा सविस्तर आढावा घेताना त्यांनी सांगितले की, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेतून ६ कोटी पेशांना









थेट लाभ मिळाला. डीबीटीद्वारे ३.६ लाख कोटी रुपये ८६ लाख कोटी बँकखात्यांवर जमा झाले. अयुष्मान भारत योजनेतून ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार, पीएम किसान सन्मान निधीतून ६ कोटी शेतकऱ्यांना वर्षाला ६,००० रुपये, पीएम उज्वला योजनेतून १० कोटी गरीब महिलांना मोफत गॅससिलेंडर, जलजीवन मिशनद्वारे ९ कोटी ग्रामीण कुटुंबांना नळजलपुरवठा, १२ लाख किसानांचे कर्जमाफी, ९ लाख गावांना वीजपुरवठा, ९.३ कोटी आयुष्मान कार्डे अशा विविध योजनांचा लाभ मिळाला असल्याचे त्यांनी नमुद केले.

माजी आमदार कृष्णाजी गजबे पुढे म्हणाले, “प्रथम देश, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः या ध्येयाने विकसित भारत घडविण्यासाठी शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येकापर्यंत पोहोचवा.” बूथ-स्तरावर संघटना मजबूत करून जनतेच्या विकासासाठी अखंड कार्य करावे." याप्रसंगी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष मोतीलाल कुकरेजा, जिल्हा महामंत्री सदानंद कुथे, भाजपचे ज्येष्ठ नेते रामभाऊ पडोले गुरुजी, आय टी सेल चे संयोजक आनंदजी खजानजी, स्थानिक नगरसेवक व भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शिबिरात बूथ मजबुतीकरण, सोशल मीडिया रणनीती, शासनयोजना प्रसार व आगामी कार्यक्रमांची तयारी यावर मार्गदर्शन झाले. संवादात्मक सत्रात कार्यकर्त्यांनी अनुभव व सूचना मांडल्या. कार्यशाळेमुळे कार्यकर्त्यांना नवीन दिशा व ऊर्जा मिळाली असून पक्ष-संघटना बळकटीकरणासाठी प्रेरणा लाभल्याची भावना सहभागींनी व्यक्त केली.

## मा. मोहन मेश्राम (गायक) यांची सांस्कृतिक लोककला ऑल इंडिया चंद्रपूर जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती

विदर्भ केसरी । देसाईगंज

चंद्रपूर जिल्ह्याचे राजुरा येथील प्रसिद्ध नामवंत ज्ञानवंत, गायक, शिक्षक व उत्तम वक्ते सन्माननीय मोहनदास मेश्राम यांना सांस्कृतिक लोककला मंच ऑल इंडिया या संस्थेने चंद्रपूर जिल्हाध्यक्ष पदी, महाराष्ट्राच्या महिला अध्यक्ष प्रसिद्ध गायिका सौ करुणाताई कोशेकर यांनी नियुक्तीपत्र देऊन त्यांना सन्मानित केले. मोहनदास मेश्राम हे गायक असूनही ते प्राध्यापक आहेत. त्यांचा संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात प्रत्येक कलावंत, शिक्षण अथवा राजकीय क्षेत्र असेल अशा सर्वच सामाजिक क्षेत्रामध्ये मेश्राम सरांचा चांगला परिचय आहे. सांस्कृतिक लोककला मंच ऑल इंडिया हे संघटन, त्यांच्या कुशल बुद्धिमत्तेमधून कुशल संघटक, उत्तम तबला वादक तसेच गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष आहेत म्हणून हे चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये प्रत्येक गावात प्रत्येक तालुक्यात संघटन पोहोचेल असा आशावाद महाराष्ट्राच्या महिला अध्यक्ष करुणाताई कोशेकर यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी बरेच कलावंत मंडळी प्रामुख्याने उपस्थित होते. उपस्थित कलावंतांनी तसेच विविध क्षेत्रातून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## गडचिरोली-आरमोरी मार्गाच्या चौपदरीकरणाचा मार्ग मोकळा

### 'मे' अखेर कामाला होणार सुरुवात पुणे येथील 'टी अँड टी' कंपनीला ४८० कोटींचे कंत्राट

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे

गडचिरोली :- जिल्ह्यातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या गडचिरोली ते आरमोरी या ३७.९ किलोमीटर मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम आता प्रत्यक्ष सुरू होणार आहे. या कामासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, मे महिन्याच्या अखेरीस या भव्य प्रकल्पाचा 'श्रीगणेशा' होणार आहे. पुणे येथील प्रसिद्ध 'टी अँन्ड टी' इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला हे कंत्राट देण्यात आले आहे. ४८० कोटींचा निधी आणि दर्जेदार काम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाकडून या कामाला मंजुरी मिळाली आहे.

अंदाजे ४८० कोटी रुपयांच्या निधीतून हे काम पूर्ण केले जाणार आहे. विशेष म्हणजे, निविदा प्रक्रियेत कंपनीने ३१.७ टक्के कमी दराने हे कंत्राट मिळवले असले तरी, कामाच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी माहिती विभागाकडून देण्यात आली आहे. सिमेंट कॉंक्रीट रस्ता: गडचिरोली शहरातील




इंदिरा गांधी चौक ते कठाणी नदीपर्यंत आणि आरमोरी शहरातील वडासा टी-पॉईंटपर्यंत सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता असणार आहे. वनक्षेत्राची काळजी: वन आच्छादित भागातून जाणाऱ्या मार्गावर डांबरीकरण केले जाणार असून, वन्यप्राण्यांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घेतली जाणार आहे. दुभाजकासह रुंदीकरण: संपूर्ण मार्गावर दुभाजक (डिव्हायडर) असणार आहे, ज्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होऊन वाहतूक शिस्तबद्ध होईल. चार नवीन पुलांची निर्मिती या मार्गावर प्रवाशांना पावसाळ्यात मोठा त्रास सहन करावा लागत असे. ही समस्या सोडवण्यासाठी चार महत्त्वाच्या नद्या व नाल्यांवर नवीन पुलांचे बांधकाम करण्यात येणार आहे. १) कठाणी नदी (जुना पूल बदलणार), २) पाल नदी, ३) वसा-पोर्ला जवळचा नाला, ४) देऊळगाव जवळील खोब्रागडी नदी, हे पूल उंचीवर बांधले जाणार असल्याने पावसाळ्यात पूरपरिस्थितीतही वाहतूक खंडित होणार नाही.

शेतमाल आणि वनोपजाला मोठी बाजारपेठ: हा मार्ग साकोली मार्गे मुंबई- कोलकाता राष्ट्रीय महामार्गाला जोडला जात असल्याने जिल्ह्यासाठी हा 'प्रगतीचा महामार्ग' ठरणार आहे. यामुळे गडचिरोलीतील उच्च दर्जाचे वनउपज, शेतमाल, बांबू आणि तेंदुपत्ता यांसारख्या मालाला थेट मुंबई आणि कोलकात्यासारख्या मोठ्या शहरांच्या बाजारपेठा उपलब्ध होतील. वेळेची बचत आणि सुरक्षित प्रवास या प्रकल्पामुळे गडचिरोली ते आरमोरी हे अंतर कमी वेळेत पूर्ण होईल. तसेच, झाडांची कत्तल कमीत कमी करून पर्यावरणपूरक पद्धतीने काम करण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे.

## गोरगुटाटा येथील ट्रान्सफॉर्मर बदला; भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा इशारा

विदर्भ केसरी । एटापल्ली



तालुक्यातील गट्टा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गोरगुटाटा येथील विद्युत ट्रान्सफॉर्मर गेल्या अनेक दिवसांपासून जळाल्याने संपूर्ण गाव अंधारात आहे. या समस्येमुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी अखेर भारतीय कम्युनिस्ट पक्षाकडे (भाकपा) धाव घेत दाद मागितली आहे.

नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत भाकपाचे जिल्हा सहसचिव कॉ. सचिन मोतकुरवार यांनी महावितरणने हा ट्रान्सफॉर्मर तात्काळ बदलून नवीन बसवावा, अशी आग्रही मागणी केली आहे. नागरिकांचे हाल, प्रशासनाचे दुर्लक्ष मिळालेल्या माहितीनुसार, गोरगुटाटा येथील ट्रान्सफॉर्मर खराब झाल्यामुळे गावातील वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे.

सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याने विजेअभावी नागरिकांचे जगणे असह्य झाले आहे. रात्रीच्या वेळी अंधारामुळे चोऱ्यांचे आणि वन्य प्राण्यांचे भय निर्माण झाले असून, पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही वीज विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कॉ. सचिन मोतकुरवार यांचा पुढाकार गावातील शिष्टमंडळाने कॉ. सचिन मोतकुरवार यांची भेट घेऊन आपली समस्या मांडली. त्यानंतर मोतकुरवार यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली.

"एकीकडे सरकार डिजिटल इंडियाच्या गप्पा मारत असताना, दुसरीकडे एटापल्लीसारख्या दुर्गम भागातील गावांना मूलभूत वीज सुविधेसाठी वणवण करावी लागत आहे. उन्हाळ्याच्या दिवसात नागरिकांना वेठीस धरणे चुकीचे आहे," असे मोतकुरवार यांनी यावेळी नमूद केले.

> भाकपाने संबंधित विभागाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जर गोरगुटाटा येथील खराब ट्रान्सफॉर्मर येत्या काही दिवसांत बदलून नवीन बसवला नाही, तर भारतीय कम्युनिस्ट पक्ष नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडेल. "गोरगुटाटा येथील नागरिक मागील अनेक दिवसांपासून अंधारात आहेत. प्रशासनाने तांत्रिक कारणांचे रडगाणे न गाता, तातडीने नवीन ट्रान्सफॉर्मर बसवून वीजपुरवठा सुरळीत करावा.
> -"कॉ. सचिन मोतकुरवार जिल्हा सहसचिव, भाकपा.

# गडचिरोली TODAY GOOD MORNING

BREKING NEWS

दैंनिक विदर्भ केसरी — विदर्भाचा मानबिंदू

शनिवार, दि. 11 एप्रिल 2026




Selected

## गडचिरोली :- गुरनोली व घाटी रेती वितरण प्रकरणात चौकशी समिती नियुक्त




गडचिरोली :- जिल्ह्यातील राखीव रेतीघाटांमधून घरकुल लाभार्थ्यांसाठी आरक्षित असलेली रेती खाजगी कंत्राटदारांना पुरवण्यात आल्याच्या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष चौकशी समितीची नियुक्ती केली आहे. दोषींवर होणार कडक कारवाई गुरनोली आणि घाटी येथील रेतीघाटांमधून घरकुल लाभार्थ्यांची रेती नियमबाह्यरीत्या खाजगी कंत्राटदारांना दिल्याबाबत माध्यमातून वृत्त प्रकाशित झाले होते. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी समिती गठीत केली असून, या समितीच्या अहवालानुसार जे कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. 'महाखनिज' प्रणालीत तांत्रिक बदल भविष्यात अशा प्रकारच्या अनियंत्रित रेती उपशाला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने तांत्रिक पावलेही उचलली आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील राखीव रेतीघाटांमधून स्थानिक रहिवासी (वैयक्तिक वापर) आणि घरकुल लाभार्थी यांच्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही शासकीय प्रकल्पांसाठी किंवा कामांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेशिवाय वाळू उपलब्ध होऊ नये, यासाठी 'महाखनिज' प्रणालीमध्ये आवश्यक बदल करण्याचे निर्देश मे. शौर्या टेक्नोसॉफ्ट प्रा. लि. पुणे यांना देण्यात आले आहेत. आतापर्यंतचे रेती वितरण आणि सद्यस्थिती जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत जिल्ह्यातील हजारो लाभार्थ्यांना रेतीचा पुरवठा करण्यात आला आहे. स्थानिक रहिवासी जिल्ह्यातील 1,771 स्थानिक रहिवाशांना त्यांच्या वैयक्तिक वापरासाठी एकूण 14 हजार 246 ब्रास वाळू उपलब्ध करून देण्यात आली आहे. घरकुल लाभार्थी: एकूण 32 हजार 129 घरकुल लाभार्थ्यांना आतापर्यंत 1 लाख 61 हजार 320 ब्रास वाळूचा पुरवठा करण्यात आला आहे. सध्याच्या नियमांनुसार, स्थानिक वापरासाठी 600 रुपये स्वामित्वधन व इतर रकमांचा भरणा करून वाळू दिली जात आहे. तसेच, घरकुल लाभार्थ्यांना कमाल 5 ब्रासपर्यंत वाळू विनामूल्य वितरित केली जात असून, ही प्रक्रिया जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांच्या स्तरावरून सुरू आहे.

# तर 'लाडकी बहीण' योजना बंद करा

## निवृत्त कर्मचाऱ्यांना हक्काचे वेतन न दिल्याने न्यायालय संतप्त

विदर्भ केसरी । मुंबई

महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना एकीकडे लोकप्रिय ठरत असताना, दुसरीकडे या योजनेवरून न्यायालयीन पातळीवर सरकारला फटकार बसली आहे. निवृत्त कर्मचाऱ्यांना हक्काचे वेतन आणि लाभ न मिळाल्याच्या मुद्द्यावरून मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातून निवृत्त झालेल्या एका महिला कर्मचाऱ्याला सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन आणि इतर लाभ मिळाले नव्हते. अनेक वेळा पाठपुरावा करूनही योग्य प्रतिसाद न मिळाल्याने संबंधित कर्मचाऱ्याने अखेर न्यायालयात धाव घेतली. या याचिकेवर सुनावणी दरम्यान न्यायालयाने प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर ताशेरे ओढले. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत म्हटले की, "सरकारकडे पैसे नसतील, तर आकर्षक योजना राबवण्याऐवजी आधी कर्मचाऱ्यांचे हक्काचे पैसे द्या." 'लाडकी बहीण' योजनेचा संदर्भ देत न्यायालयाने सुनावले की, "जर पेन्शन देण्यासाठी निधी नसेल, तर अशा योजना बंद करा." सुनावणीदरम्यान न्यायालयाने अधिकाऱ्यांच्या सुविधांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "अतिरिक्त आयुक्तांना वेतन आणि सर्व सुविधा मिळतात, पण आयुष्यभर सेवा केलेल्या शिक्षकांसाठी पैसे नाहीत, हे आश्चर्यकारक आहे," असे न्यायालयाने नमूद केले. आठव्या वेतन आयोगाच्या चर्चेचा काळ सुरू



असताना अजूनही सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी प्रलंबित असल्याबद्दलही कोर्टाने नाराजी व्यक्त केली. न्यायालयाने प्रशासनाला फटकारताना उपरोधिक भाषेत कठोर निरीक्षण नोंदवले. "पालिकेकडे पैसे नसतील, तर कार्यालयातील टेबल, खुर्च्या आणि एसी विकून पैसे उभे करा," असे सांगत न्यायालयाने कारभारातील विसंगती उघड केली. तसेच "महानगरपालिका आयुक्त आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आलिशान गाड्या विकण्याचा विचार करा, पण निवृत्त कर्मचाऱ्यांचे हक्काचे पैसे तातडीने द्या," असा स्पष्ट आदेश दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, निवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन देणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे आणि त्यांना यापासून वंचित ठेवता येणार नाही. प्रशासनाने कोणत्याही परिस्थितीत निधीची व्यवस्था करून तातडीने थकबाकी अदा करावी, असे निर्देशही देण्यात आले.

### सरकारपुढे मोठे आव्हान उभे

या निर्णयामुळे राज्य सरकार आणि पालिका प्रशासनावर दबाव वाढण्याची शक्यता असून, आगामी काळात या प्रकरणाचे राजकीय पडसाद उमटण्याची चिन्हे दिसत आहेत. एकीकडे कल्याणकारी योजनांचा विस्तार आणि दुसरीकडे आर्थिक शिस्त यांचा समतोल साधण्याचे मोठे आव्हान सरकारपुढे उभे ठाकले आहे.

### तातडीने थकबाकी अदा करावी

या प्रकरणातून एकीकडे सरकारच्या लोककल्याणकारी योजनांवर होणारा मोठा खर्च आणि दुसरीकडे कर्मचाऱ्यांच्या मूलभूत हक्कांकडे होत असलेले दुर्लक्ष यावर प्रश्न उपस्थित झाला आहे. 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्यात येतात. ही योजना सुरू झाल्यापासून विरोधकांकडून तिच्यावर सातत्याने टीका होत असतानाच आता न्यायालयानेही अप्रत्यक्षपणे यावर बोट ठेवले आहे.

## नगराध्यक्ष ॲड प्रणोती निंबोरकर यांच्या पुढाकारातून गडचिरोलीत नालीसफाई विशेष मोहिमेला सुरुवात..!

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे

गडचिरोली शहरातील स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी नगराध्यक्ष ॲड. प्रणोती निंबोरकर यांच्या पुढाकारातून नालीसफाई विशेष मोहिमेला उत्साहात सुरुवात करण्यात आली. या मोहिमेच्या पहिल्या दिवशी प्रभाग क्रमांक ५, विवेकानंद नगर येथे प्रत्यक्ष कामाला प्रारंभ झाला. शहर स्वच्छ, निरोगी आणि सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमात स्थानिक प्रशासन आणि लोकप्रतिनिधी सक्रियपणे सहभागी झाले आहेत.

नगराध्यक्ष ॲड. प्रणोती निंबोरकर यांनी स्वतः उपस्थित राहून नालीसफाई कामांची पाहणी




केली आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

यावेळी नगरसेवक सागर निंबोरकर तसेच नगरसेविका सीमाताई कन्नमवार यांचीही प्रमुख उपस्थिती होती. सर्वांनी मिळून परिसरातील नाल्यांची स्वच्छता, अडथळे दूर करणे आणि साचलेला कचरा हटविण्याच्या कामाचा आढावा घेतला. नगराध्यक्ष प्रणोती निंबोरकर यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. "स्वच्छता हीच खरी सेवा" या भावनेतून प्रत्येक नागरिकाने आपला परिसर स्वच्छ ठेवण्यास हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले. नाल्यांमध्ये कचरा टाकू नये, प्लास्टिकचा वापर टाळावा आणि शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, अशी जनजागृतीही करण्यात आली.

प्रभाग क्रमांक ५ पासून सुरू झालेली ही विशेष मोहीम टप्प्याटप्प्याने संपूर्ण शहरात राबविण्यात येणार असून, पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची सखोल स्वच्छता करून नागरिकांना सुरक्षित व स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रशासनाचा मानस आहे. नगराध्यक्ष प्रणोती निंबोरकर यांच्या नेतृत्वाखाली गडचिरोली शहर स्वच्छतेच्या दिशेने ठोस पावले उचलत असल्याचे स्पष्ट होत असून, या उपक्रमाचे नागरिकांकडूनही स्वागत केले जात आहे.

## मुंढे यांची बदलीच्या ठिकाणी रूजू होण्यापूर्वी 'पुन्हा बदली'!

विदर्भ केसरी । मुंबई

'मिस्टर क्लीन' अधिकारी म्हणून ख्याती असलेल्या तुकाराम मुंढे यांची मागच्या आठवड्यात करण्यात आलेली बदली ते नव्या ठिकाणी रुजू होण्यापूर्वी आश्चर्यकारकरित्या अंधातरी ठेवण्यात आली आहे. परिणामी, मुंढे पदाच्या प्रतीक्षेत आहेत. मुंढे यांना नव्या ठिकाणी रुजू होवू न देण्यास नाशिक कुंभमेळ्याच्या प्रस्तावित कामांच्या आर्थिक उलाढालीची किनार असल्याची चर्चा रंगली आहे. सामान्य प्रशासन विभागाने भारतीय प्रशासन सेवेतील १० अधिकाऱ्यांच्या ३१ जानेवारी रोजी बदल्या केल्या. त्यामध्ये तुकाराम मुंढे यांना 'दिव्यांग सक्षमीकरण विभागा'च्या सचिव पदावरुन हटवून 'आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभागा'चे सचिवपद दिले होते. 'आपत्ती व्यवस्थापन विभागा'च्या प्रधान सचिव पदावरुन हटवून विनिता वैद सिंगल यांना 'मृद व जल संधारण विभागा'च्या प्रधान सचिवपदी नियुक्ती दिली गेली. तर मुंढे सचिव असलेल्या दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या सचिवपदी माणिक गुरसाळ यांची नियुक्ती करण्यात आली होती. तुकाराम मुंढे यांना दिव्यांग सक्षमीकरण विभागात सप्टेंबर २०२५ मध्ये आणले होते. आताच्या बदली वेळी मुंढे हे पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीचे निरीक्षक म्हणून गेले होते. दरम्यान मुंढे यांच्या आईचे पुण्यात निधन झाल्याने ते राज्यात परतले.

## नगरपालिकेचा "पाणी विक्री घोटाळा"

### महाराजा मार्केटमध्ये करचोरीचाही संशय, चौकशीची मागणी तीव्र...!

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे

गडचिरोली :- शहरातील नगरपालिकेच्या कारभारावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शहरातील एका धनदांडग्या व्यक्तीच्या मालकीच्या जागेवर, स्वतःच्या विहिरीत मुबलक पाणी उपलब्ध असतांनाही नगरपालिकेकडून छुप्या पद्धतीने टँकरद्वारे पाण्याची विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार आज उघडकीस आला. ही घटना आज सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास चंद्रपूर रोडवरील फुटक्या देवळासमोरील परिसरात घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, सर्वे क्रमांक १६८१, महाराजा मार्केट परिसरात सुमारे ५००० चौरस फुटांवर भव्य दोन मजली शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्यात आले आहे. या ठिकाणी एचडीएफसी बँकेसह अनेक व्यावसायिक दुकाने कार्यरत आहेत. याशिवाय सुमारे २० ते २२ हजार चौरस फूट मोकळी जागा उपलब्ध असून, त्या परिसरात इंग्रजकालीन मोठी विहीर आजही अस्तित्वात आहे. असे असतांनाही या विहिरीतील पाण्याचा वापर न करता नगरपालिकेच्या टँकरद्वारे पाण्याची विक्री होत असल्याचे उघड झाले. आज सकाळी या ठिकाणी नगरपालिकेचा टँकर लावून पाण्याची विक्री सुरू असतांना काही जागरूक नागरिकांनी हा प्रकार रंगेहात पकडला. अधिकाऱ्यांना जाब विचारल्यानंतर टँकर तात्काळ मागे बोलावण्यात आला. त्यानंतर प्रकरण दडपण्याचा प्रयत्न म्हणून संबंधित बिल्डिंग मालकाकडून केवळ ७०० रुपयांची पावती काढण्यात आल्याचेही समोर आले आहे.

दरम्यान, या प्रकरणाला आणखी एक गंभीर वळण मिळाले असून, याच महाराजा मार्केट (सर्वे क्रमांक १६८१) मध्ये मागील २० वर्षांपासून करचोरी होत असल्याची तक्रार यापूर्वीही करण्यात आली होती. मात्र, त्या वेळीही नगरपालिकेकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली




नसल्याचे समोर येत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, या आस्थापनेची सखोल चौकशी केल्यास मागील २० ते २५ वर्षांपासूनच्या करचोरीचा आकडा कोटींच्या घरात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. शॉपिंग कॉम्प्लेक्समधील व्यावसायिक उत्पन्न, भाडेकरूंकडून मिळणारा किराया, तसेच इतर आर्थिक व्यवहारांचा तपशीलवार हिशोब तपासून संबंधितांवर योग्य करआकारणी करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. गडचिरोली शहरात अनेक भागांत पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असताना सामान्य नागरिकांना वेळेवर पाणीपुरवठा मिळत नाही. अशा परिस्थितीत, ज्या ठिकाणी पाण्याची मुबलक सुविधा उपलब्ध आहे, त्या ठिकाणी नगरपालिकेकडून खाजगी स्वरूपात पाणी विक्री होणे अत्यंत संतापजनक असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची माहिती प्रभारी मुख्य अधिकारी अर्चना मेंढे तसेच पाणीपुरवठा सभापती लीलाधर भरडकर यांना देण्यात आली असून, त्यांनी तात्काळ चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. दरम्यान, गडचिरोली नगरपालिकेत अशा प्रकारचे गैरव्यवहार इतर विभागांमध्येही सुरू आहेत का, याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच महाराजा मार्केटमधील करचोरी प्रकरणाचीही उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

## सिरोंचा महामार्गाला मिळणार गती

### माजी खासदार डॉ. अशोकजी नेते यांच्या पाठपुराव्याला यश..!

विदर्भ केसरी । गडचिरोली

जिल्ह्याच्या दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या सिरोंचा ते आलापल्ली (राष्ट्रीय महामार्ग ३५३-सी) या रखडलेल्या मार्गाच्या कामाला अखेर गती मिळण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. अनेक वर्षांपासून संथ गतीने सुरू असलेल्या या कामाकडे केंद्र सरकारने लक्ष वेधले असून, प्रशासकीय पातळीवर हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून माजी खासदार तथा भाजप अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांची दखल घेत केंद्र सरकारकडून संबंधित विभागांना तातडीने निर्देश देण्यात आले आहेत. जनहितासाठी पुढाकार: मागील अनेक वर्षांपासून खराब रस्ते आणि अपूर्ण कामामुळे स्थानिक नागरिक, विशेषतः आदिवासी बांधव, मोठ्या






अडचणींचा सामना करत होते. आरोग्य सेवा, शिक्षण व रोजगाराच्या संधींवर याचा प्रतिकूल परिणाम होत होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन डॉ. अशोकजी नेते यांनी १ एप्रिल २०२६ रोजी केंद्र सरकारकडे सविस्तर निवेदन सादर करून या मार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली होती. केंद्र सरकारकडून तातडीचे निर्देश: या निवेदनाची दखल घेत भारत सरकारच्या रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाने तातडीने पावले उचलली. मंत्रालयाचे तांत्रिक सल्लागार बाळासाहेब ठेंग यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता (मुंबई) तसेच अधीक्षक अभियंता (नागपूर) यांना लेखी आदेश जारी केले. ७ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या निर्देशांमध्ये या महामार्गाचे महत्त्व अधोरेखित करत, कामातील अडथळे दूर करून ते जलदगतीने पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. विकासाची जीवनवाहिनी: "हा मार्ग केवळ रस्ता नसून या भागातील व्यापार, वाहतूक आणि सर्वांगीण विकासाची जीवनवाहिनी आहे. दुर्गम भागातील नागरिकांचा विकास रखडू नये, हीच माझी भूमिका आहे," असे मत डॉ. अशोक नेते यांनी व्यक्त केले. नागरिकांना होणारे फायदे: या महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर सिरोंचा ते आलापल्ली प्रवास अधिक जलद व सुरक्षित होईल, स्थानिक शेतमाल व व्यापाराला मोठी चालना मिळेल, आरोग्य व आपत्कालीन सेवा वेळेत उपलब्ध होतील, दुर्गम भागातील विकासाला नवी दिशा मिळेल आनंदाचे वातावरण: जनहितासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या डॉ. अशोकजी नेते यांच्या प्रयत्नांमुळे आणि प्रशासनाच्या सकारात्मक प्रतिसादामुळे गडचिरोली जिल्ह्यातील नागरिकांमध्ये समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही घडामोड केवळ रस्त्याच्या कामापुरती मर्यादित नसून, गडचिरोलीच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

# पितृछाया हरपली तरी जिद्द हरली नाही

## गडचिरोली येथील सुरज कुरुडकर पोलीस भरतीत यशस्वी

विदर्भ केसरी । मंगेश सहारे

गडचिरोली : गडचिरोली येथील सूरज शंकर कुरुडकर यांनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर पोलीस भरतीत पहिल्याच प्रयत्नात यश संपादन करत आपल्या कुटुंबासह परिसराचे नाव उज्वल केले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत त्यांनी केलेली ही कामगिरी अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. सूरज कुरुडकर यांच्या आयुष्यात लहानपणीच मोठा आघात झाला. बालवयातच त्यांच्या डोक्यावरची पितृछाया हरपली. त्यामुळे कुटुंबाची जबाबदारी आणि आयुष्याचा संघर्ष त्यांनी लहान वयातच अनुभवला. आर्थिक परिस्थिती साधी असतानाही त्यांनी कधीही आपले स्वप्न सोडले नाही. पोलीस दलात भरती होण्याचे ध्येय त्यांनी मनात ठेऊन सातत्याने मेहनत सुरू ठेवली. स्वप्न पूर्ण करण्यासाठी सूरज यांनी अत्यंत कष्टमय दिनक्रम स्वीकारला होता. सकाळी पहाटे उठून ते ग्राउंडवर जाऊन नियमितपणे शारीरिक सराव करत असत. त्यानंतर दिवसभर आपल्या कुटुंबाला हातभार लावण्यासाठी किराणा



दुकान सांभाळण्याची जबाबदारी पार पाडत होते. दिवसभराची धावपळ झाल्यानंतरही ते थांबत नव्हते; रात्री उशिरापर्यंत अभ्यास करून पोलीस भरतीची तयारी करत राहिले. मर्यादित साधनसामग्री, आर्थिक अडचणी आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या असूनही त्यांनी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित ठेवले. सातत्यपूर्ण परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर त्यांनी अखेर पोलीस भरतीत पहिल्याच प्रयत्नात यश मिळवले. सूरज कुरुडकर यांच्या या यशामुळे त्यांच्या कुटुंबात तसेच परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. संघर्षातून मिळवलेले हे यश आज अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असून कठीण परिस्थितीतही मेहनतीच्या बळावर यश मिळवता येते, हा संदेश त्यांच्या कामगिरीतून मिळत आहे.

## जिमलगट्ठा जंगलात आगीचा भीषण तांडव ; वनविभागाच्या दुर्लक्षावर सवाल...!

विदर्भ केसरी । देसाईगंज

सिरोंचा वनविभागांतर्गत जिमलगट्ठा वनपरिक्षेत्रात लागलेल्या भीषण जंगलआगीने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रेपणपल्ली–जिमलगट्ठा राष्ट्रीय महामार्ग ३५३C लगत अवघ्या शंभर मीटर अंतरावर असलेल्या जंगलात ही आग भडकली असून, आगीने अक्षरशः तांडव मांडल्याचे चित्र दिसून येत आहे. या आगीमुळे मोठ्या प्रमाणात मौल्यवान वनसंपत्ती जळून खाक होण्याची भीती व्यक्त होत आहे. पर्यावरणीय नुकसानही गंभीर स्वरूपाचे असून, जैवविविधतेवर त्याचा दूरगामी परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



विशेष म्हणजे, या परिसरालगत गुंडेरा व अर्कपल्ली ही गावे असून, तेथील नागरिकांच्या सुरक्षिततेसह वन्यप्राण्यांच्या जीवितालाही मोठा धोका निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, आग लागल्यानंतरही वनविभागाकडून त्वरित आणि प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे आगीचा फैलाव वाढत असून परिस्थिती अधिकच गंभीर बनत आहे. आगीच्या विळख्यात सापडलेल्या जंगलामुळे वन्यजीवांचे स्थलांतर वाढण्याची शक्यता असून, मानव- वन्यजीव संघर्षाचीही भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, जिमलगट्ठा वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे वनविभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेबद्दल संताप व्यक्त केला जात आहे.